नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक २२९ * * नागपूर * गुरुवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## संसद आमचे निर्णय रद्द करू शकत नाही

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९ :

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारच्या न्यायाधिकरण सुधारणा कायदा २०२१ मधील अनेक प्रमुख तरतुदी रद्द केल्या आहेत. न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले आहे की संसद किरकोळ बदल करून न्यायालयाचा निर्णय रद्द करू शकत नाही.

न्यायालयाने म्हटले की सरकारने त्याच तरतुदी पुन्हा लागू केल्या आहेत ज्या न्यायालयाने पूर्वी रद्द केल्या होत्या. सरन्यायाधीश बीआर गवई आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांनी बुधवारी १३७ पानांचा निकाल दिला. ११ नोव्हेंबर रोजी सुनावणी संपल्यानंतर न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवला होता.

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## सत्यवादी सरसंघचालक

सरसंघचालक मोहन भागवत आज स्पष्ट बोलले. अनेक तथाकथित हिंदू नेते भारताला हिंदू राष्ट्र घोषित करा म्हणून वारंवार बोलतात परंतु, भारताचा आत्मा सर्वधर्मसमभाव आहे. भारताची स्वतःची अशी उदार परंपरा आहे कारण जगात आपला भारत एकमात्र असा देश आहे की ज्यामध्ये हिंदू, मुस्लिम, शीख, ईसाई, बौद्ध, पारशी यांसह इतर अनेक धमार्चे लोक गुण्यागोविंदाने नांदतात, एकमेकांच्या सोबत एकमेकांच्या सणांना अगदी नाचत हजेरी लावतात म्हणजेच संपूर्ण देश, मनाने अतिशय उदार आहे. देशाला हिंदू राष्ट्र घोषित केले किंवा न केले तरी या देशातील 80 टक्के जनता हिंदू आहे हे सांगायला कोणाचीच गरज नाही, किंबहुना आमचीही गरज नाही. एखाद्या धर्मामध्ये अतिजातीयवादी किंवा आतंकवादी असले तरी त्यांचे प्रमाण अत्यंत अल्प असते. हे लोक आपले पोट जाळण्यासाठी आणि आपली मतांची मोट भरण्यासाठी समाजात अशांतता पसरवीत असतात. लोकांचे जीव घेण्यासाठी ते कमी करीत नाहीत कालच कुख्यात माओवादी हिडमा याला ठार मारण्यात आले. या हिडमाला त्याच्या आईने सांगूनही तो स्वतःच्या आईचेही ऐकायला तयार नव्हता, मग अशांचा अंत असाच होतो. त्यामुळे मोहन भागवत यांनी आपल्या देशाला हिंदू राष्ट्र वगैरे घोषित न करता जो संदेश दिला आहे त्याचे महत्त्व आपण समजून घेतलेच पाहिजे. या देशात शांतता हवी असेल. परस्परांसोबत प्रेमभाव हवा असेल तर सरसंघ चालकांचे म्हणणे आपण मान्य केलेच पाहिजे. जगातील सर्वात बलाढ्य संघटना असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रमुखांनी जे विचार व्यक्त केलेले आहेत ते या देशासाठी निश्चितच लाभदायक आहेत. भारत स्वतंत्र झाल्यावर ज्या संघटनेचा अत्यंत आदराने उल्लेख करण्यात आला, त्याच संघटनेचे सरसंघचालक आज गुवाहाटी यासारख्या ठिकाणी बोलते झाले. भारतावर कित्येक वर्षे मुस्लिम आणि ईसाईनी राज्य केले. औरंगजेबा सारखा हिंदू धर्म द्वेष्टाही या देशात राहणाऱ्या बहुसंख्य हिंदूंना धर्म बदलण्यास भाग पाडू शकला नाही. छत्रपती संभाजी राजे यांनी आपल्या धर्माच्या आणि स्वराज्याच्या रक्षणासाठी अनन्वित यातना भोगून स्वतःचे प्राणार्पण केले हा आपल्या धमार्चा आणि देशाचा इतिहास आहे. या देशाला खऱ्या अर्थाने आता ज्या पद्धतीने मोहन भागवत म्हणतात त्यांच्या सारख्याच सर्व समावेशक विचारांची गरज आहे. प्रत्येक धर्मात धार्मिक अतिरेकी असतात पण सर्वसामान्य जनता कधीच त्यांचे ऐकत नाही आणि मग भिंद्रानवाल्यांसारख्या लोकांना आपला जीव गमावावा लागतो. सरसंघ चालकांनी भारताच्या संस्कृतीचा उद्धोष केला तो सर्वांनी मनात साठवून ठेवावा आणि या देशाचे उज्वल भविष्य करण्यासाठी हातभार लावावा, एवढेच या निमित्ताने सांगावेसे वाटते.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# नाराज शिंदे दिल्लीला !

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज अचानक दिल्ली दौऱ्यावर गेलेत. ते तिथे भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांची भेट घेऊन त्यांच्याशी राज्यातील राजकीय घटनाक्रमावर चर्चा करणार असल्याची माहिती आहे.

सत्ताधारी शिवसेनेने मंगळवारी भाजपवर आपले पदाधिकारी फोडण्याचा आरोप केला होता. तदनंतर शिंदे गटाच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कारही टाकला होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी शिंदे दिल्ली दौऱ्यावर गेलेत हे विशेष.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शिंदे गटाच्या मंत्र्यांनी भाजपवर फोडाफोडीचे आरोप करत या बैठकीवर बहिष्कार टाकला. त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची त्यांच्या दालनात भेट घेतली. फडणवीसांनी शिंदेंपुढेच त्यांच्या मंत्र्यांची खरडपट्टी काढली. या घटनेनंतर शिंदेंनी आज फडणवीस यांच्यासोबत एका व्यासपीठावर एकत्र येणे टाळले. यामुळे एकनाथ शिंदे भाजपवर नाराज झाल्याचा दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे आज दिल्लीला रवाना झालेत.

नाराजी नाट्यावर करणार चर्चा



सूत्रांच्या माहितीनुसार, शिंदे दिल्लीत भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांची भेट घेऊन राज्यातील राजकीय घटनाक्रमावर चर्चा करतील. ते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व भाजप अध्यक्ष जे पी नड्डा यांचीही भेट घेऊन त्यांच्याकडे आपले गाऱ्हाणे मांडण्याचा प्रयत्न करतील. त्यानंतर तेथूनच ते नितीश कुमार यांच्या शपथविधी सोहळ्याला हजर राहण्यासाठी बिहारची राजधानी पाटण्याला जातील.

उल्लेखनीय बाब म्हणजे राज्यातील सत्ताधारी महायुतीत काही वाद झाला तर एकनाथ शिंदे नेहमीच दिल्लीत जाऊन त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करतात. महायुतीतील वाढता तणाव पाहता शिंदे दिल्लीला गेल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

## मुंढवा भूखंड घोटाळ्यात पार्थला क्लीन चिट

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १९ :



पुण्यातील मुंढवा येथील शासकीय भूखंडाच्या कथित गैरव्यवहार प्रकरणात राज्य सरकारने नियुक्त केलेल्या एका समितीने अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांना कथितपणे क्लीन चिट दिली आहे.

या समितीने या प्रकरणातील मुख्य खरेदीदार शीतल तेजवानी व विक्रेते दिग्विजय पाटील यांच्यावर सदर भूखंड शासकीय असल्याची माहिती असतानाही ती खासगी मालमत्ता असल्याचे दाखवून विक्रीचा व्यवहार केल्याचा ठपका ठेवला आहे. यामुळे पार्थ पवार यांची या प्रकरणातून सुटका झाल्याचा दावा केला जात आहे.

दरम्यान, मुंढवा प्रकरणात पार्थ पवारांना मिळालेली क्लीनचिट ही महाराष्ट्राचे प्रशासन रसातळाला गेल्याचे लक्षण असल्याची टीका माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केली आहे.

पार्थ पवार संचालक असलेल्या अमेडिया कंपनीने कोरेगाव पार्क परिसरातील महार वतनाची ४० एकर जमीन खरेदी केल्याचा प्रकार उजेडात आला होता. कंपनीच्या वतीने भागीदार दिग्विजय पाटील व कुलमुखत्यारपत्र धारक शीतल तेजवानी यांच्यात दस्त नोंदणीचा व्यवहार झाला होता. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उपमहानिरीक्षक राजेंद्र मुठे यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समिती स्थापन करम्यात आली होती. या समितीने मुद्रांक महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे यांना आपला अहवाल सादर केला.

या अहवालात सरकारचा महसूल बुडवण्यात आल्याचा ठपका ठेवण्यात आला असून, ही जमीन शासकीय असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. या अहवालानुसार, अमेडिया कंपनी व शीतल तेजवानी यांच्यात खरेदी विक्री झालेल्या व्यवहाराचा दस्त ७०० हून अधिक पानांचा आहे. विशेषतः महार वतनाच्या जमीन व्यवहारात मुद्रांक शुल्कात माफी मिळवताना जिल्हा उद्योग केंद्राचे पात्रता प्रमाणपत्र जोडले नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे दस्त नोंदणीवेळी दिलेली मुद्रांक शुल्क माफी ग्राह्य ठरत नाही, मुद्रांक शुल्क माफी घेऊन महसूल बुडवल्याचा ठपकाही चौकशी समितीने आपल्या अहवालात ठेवला आहे.

### काँग्रेस, शरद पवार गट एकत्र लढणार

## मुंबई मनपाची निवडणूक

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १९ :

उद्धव ठाकरे एकटे पडणार!

मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढवण्याची घोषणा करणाऱ्या काँग्रेसने आता आपला जुना मित्रपक्ष शरद पवारांच्या राष्ट्रवादीला सोबत घेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

या प्रकरणी खासदार वर्षा गायकवाड यांनी आज शरद पवारांशी चर्चा केली आहे. त्यांनी ही चर्चा अत्यंत सकारात्मक झाल्याचा दावा केल्यामुळे पवार काँग्रेससोबत जाणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. असे झाले तर मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे एकटे पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

काँग्रेसने मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढवण्याची घोषणा केली आहे. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी गत आठवड्यात स्थानिक पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन ही घोषणा केली. त्यानंतर आता काँग्रेस आपली पुढील रणनीती ठरवण्यात व्यस्त आहे.

या अंतर्गत काँग्रेस खासदार तथा मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेऊन त्यांच्यापुढे बीएमसीची निवडणूक एकत्र लढवण्याचा प्रस्ताव ठेवला.

त्यानंतर त्या पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या, मुंबई महापालिका निवडणुकीत याआधी काँग्रेस आणि राष्ट्रवादीची आघाडी झालेली आहे. लोकशाही आणि संविधान मानणारे आम्ही पक्ष यावेळी एकत्र निवडणूक लढवावी ही आमची अपेक्षा आहे.

याबाबत आज ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याशी सकारात्मक चर्चा झालेली आहे.पुढच्या आठवड्यात पुन्हा याबाबत चर्चा होणार आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक ही इथल्या नागरी समस्या जसे ट्रॅफिक, खराब रस्ते, शिक्षण, पाणी, प्रदूषण ,महापालिकेतील भ्रष्टाचार या विषयांवर झाली पाहिजे.

ही निवडणूक धर्म, जात, भाषा यावर नको. कारण मुंबई हे असे शहर आहे जिथे देशातील सगळ्या राज्यातून लोक येतात. सगळ्यांचा या शहरातील विकासात हातभार आहे. आमची आज खूप चांगली चर्चा झाली. आमची नैसर्गिक आघाडी आहे. आम्ही सर्वजण संविधानाचा धागा मानतो. आम्ही लोकशाही मानतो. या देशात समता, बंधूता, न्याय, स्वातंत्र्य राहिले पाहिजे. मुंबईची एकता कायम राहिली पाहिजे अशी भूमिका आम्ही त्यांच्यापुढे मांडली आहे, असे त्या म्हणाल्या.

वर्षा गायकवाड यांनी यावेळी ठाकरे बंधूंच्या युतीला शुभेच्छा देत काँग्रेसची मनसेसोबत जाण्याची इच्छा नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट केले.

## नितीश कुमार यांचा आज शपथविधी

■ वृत्तसंस्था, पाटणा, दि. १९ :



नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. गुरुवारी ते १० व्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. गांधी मैदानावर सकाळी ११:३० वाजता शपथविधी सोहळा होईल.

समारंभासाठी दोन स्टेज तयार करण्यात आले आहेत. पंतप्रधान मोदी आणि ११ राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. १५० पाहुण्यांनाही आमंत्रणे पाठवण्यात आली आहेत.

तत्पूर्वी बिहार विधानसभेच्या सेंट्रल हॉलमध्ये नितीश कुमार यांची एनडीए विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड करण्यात आली. तर, सकाळी ११ वाजता पाटणा येथील भाजप कार्यालयात विधिमंडळ पक्षाची बैठक झाली. त्यात सम्राट चौधरी यांची विधिमंडळ पक्षनेते म्हणून निवड करण्यात आली. विजय सिन्हा यांची विधिमंडळ उपनेते म्हणून निवड करण्यात आली.

येथे, भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीपूर्वी, जेडीयू विधिमंडळ पक्षाची बैठक झाली ज्यामध्ये नितीश कुमार यांची नेतेपदी निवड करण्यात आली.

## फलाटावर चढली बस

बालकाचा मृत्यू
अनेक जखमी

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. १९ :

राज्य परिवहन महामंडळाच्या सिन्नर आगारातून देवपूरकडे जाण्यासाठी निघालेल्या बसचे ब्रेक नादुरुस्त झाल्याने मोठा अपघात झाला.

नियंत्रण सुटलेली बस थेट फलाटावर चढल्याने झालेल्या धडकेत सिन्नर तालुक्यातील दापूर येथील नऊ वर्षांच्या बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर त्याची आई आणि अन्य काही प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. चालक बस फलाटावर लावत असताना ब्रेक नादुरुस्त झाले. त्यामुळे बस थांबण्याऐवजी वेगाने थेट फलाटावर चढली.

## रामदेव बाबा साल्व्हंट कंपनीला आग

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :

ब्रम्हपुरी - ब्रम्हपुरी येथील रामदेव बाबो दन्नहू पँए या कंपनीमध्ये आग लागली असून अग्नीशमन दलाच्या वतीने मोठ्या प्रयत्नाने आग विझवण्यात यश आले आहे. आगीचे नेमके कारण समोर आले नसून कुठल्याही प्रकारची जिवीत हानी झाली नाही. यात कंपनीचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

सदर ठिकाणी १.२५ लाख लिटर इथेनॉलचा साठा होता. त्या ठिकाणच्या डिस्टेन्शन प्लांटला आग लागलेली आहे. सध्या कोणत्याही प्रकारची जीवित हानी झालेली नाही.

आगीची माहिती मिळताच आग विझविण्यासाठी घटनास्थळी ब्रह्मपुरी, नागभीड, सिंदेवाही व मूल येथील फायर ब्रिगेड पोचले, तसेच गडचिरोली जिल्ह्यातून दोन फायर ब्रिगेड वडसा येथून गाड्या येऊन आग विझविण्यात आली.



महानगरपालिका चंद्रपूर येथील दोन फायर टेंडर फोमसोबत रवाना करण्यात आलेले आहेत. सध्या कोणत्याही प्रकारच्या जीवित हानीची नोंद नाही.

## नक्षल नेता देवजीला कंठस्नान

■ वृत्तसंस्था, जगदलपूर, दि. १९ :

छत्तीसगड-आंध्र प्रदेश सीमेवर सुरक्षा दलांनी सात नक्षलवाद्यांना ठार मारले आहे. यामध्ये तीन महिला नक्षलवाद्यांचा समावेश आहे. या चकमकीत पॉलिटब्युरो सदस्य आणि नक्षलवाद्यांचे सरचिटणीस देवजी यांचाही मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

१८ नोव्हेंबर रोजी सकाळी ज्या भागात नक्षलवादी नेता हिडमा मारला गेला त्याच भागात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये पुन्हा चकमक सुरू आहे. सहभागी सर्वांचे मृतदेह आणि शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. चार नक्षलवाद्यांची ओळख पटली आहे आणि इतर तिघांची ओळख पटवली जात आहे.

सुरक्षा यंत्रणांना नक्षलवादी संघटनेचा एक प्रमुख नेता देवजी, ज्यामध्ये पॉलिटब्युरो सदस्य आणि सरचिटणीस यांचा समावेश आहे, या परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर या भागात सैन्य पाठवण्यात आले.

एक दिवस आधी याच भागात हिडमा आणि त्याच्या पत्नीसह सहा नक्षलवादी मारले गेले होते. आंध्र प्रदेशातील अल्लुरी सीताराम राजू जिल्ह्यातील मारेदुमिल्लीच्या घनदाट जंगलात सुरक्षा दल सध्या उपस्थित आहेत आणि शोध मोहीम सुरू आहे.

## मुंबई मेट्रो-३ ची दिव्यांग सवलत अखेर लागू

दैनिक महासागरच्या पाठपुराव्याला यश : २३ नोव्हेंबरपासून २५% सूट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने अखेर दिव्यांग प्रवाशांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. मेट्रो-३ मार्गिकेवर दिव्यांग प्रवाशांसाठी घोषित केलेली २५ टक्के सवलत येत्या रविवार, २३ नोव्हेंबरपासून लागू होत आहे. दीड महिना उलटूनही ही सवलत प्रत्यक्षात लागू न झाल्याने दिव्यांग प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी होती.

एमएमआरसीच्या जनसंपर्क विभागानुसार, सवलत लागू करण्यासाठीची तांत्रिक प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून प्रणालीमध्ये सवलत समाविष्ट करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. आवश्यक अंतिम चाचण्या पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण मेट्रो प्रणालीमध्ये ही सूट प्रभावीपणे राबवली जाणार आहे.

या निर्णयामागे दैनिक महासागरचे प्रतिनिधी दिपक कैतके यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा निर्णायक ठरला. दिव्यांग प्रवाशांना हक्काची सवलत मिळावी यासाठी कैतके यांनी सातत्याने आवाज उठवला होता. दैनिक महासागरनेही या विषयाचा संवेदनशील पद्धतीने पाठपुरावा करून प्रश्न प्रशासनाच्या टेबलावर कायम ठेवला, ज्यामुळे अखेर एमएमआरसीने निर्णयाची अंमलबजावणी करण्यास गती दिली.

सवलत लागू झाल्यानंतर मुंबईतील हजारो दिव्यांग प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. मेट्रो-३ सुरू झाल्यापासून विविध स्टेशनवरील सुविधा बंद, लिफ्ट अकार्यक्षम आणि सवलतींचा अभाव या कारणांमुळे नागरिकांची नाराजी वाढली होती. त्यामुळे ही घोषणा दिव्यांग प्रवाशांसाठी महत्त्वपूर्ण आणि सकारात्मक पाऊल मानली जात आहे.




## अजित पवार-शिंदे गट संपवण्याची भाजपची पूर्ण तयारी!




■ **मुंबई :** स्वार्थासाठी एकत्र आलेले पक्ष एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न नक्कीच करणार आहेत, त्यांची सुरवात झाली आहे. ज्या पद्धतीने भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे शिंदे गटाच्या लोकांना सोबत घेत आहेत त्यातून भाजपला शिंदे गट संपवायचा आहे हे दिसून येत आहे, असे उबाठाचे नेते विनायक राऊत यांनी म्हटले आहे.

राऊत म्हणाले की, ज्या पद्धतीने भाजपने शिंदे गटाची कबर खोदायला सुरवात केली आहे. अजित पवार, शिंदे गटाची एक-एक लफडी बाहेर काढली जात आहे, करायला लावणारे आणि बाहेर काढणारे देखील भाजपचे लोक आहेत. त्यांना दोन्ही पक्षाची गरज राहिलेली नाही. भाजप शिंदे गट आणि अजित पवार यांना जिथे संधी मिळेल तिथे ठेचायचं काम करणार आहे. राऊत म्हणाले की, आशिष शेलार यांना फार गांभीयानें घेणे गरजेचे नाही ते बकवास गिरी करतात. भाजपचे नेते कोणत्या तोंडाने आमच्यावर टीका करत आहेत. त्यांचे केंद्रातील आणि राज्यातील सरकार हे कुबड्यावर आहे. भाजपमध्ये जाणारे लोक हे पैशाच्या आमिषाने तिकडे जात आहे.पक्ष फोडीसाठी मोठ्या प्रमाणात पैशाचा वापर करत आहेत.

विनायक राऊत म्हणाले की, काँग्रेसची देशभरात जी अवस्था होत चालली आहे हे होत असतानाही त्यांना जर स्वबळाची त्यांची इच्छा असेल तर त्यांनी स्वबळावर निवडणूक लढवावी आमचा काही एकत्र या असा हट्ट नाही. आगामी मनपा निवडणुकीबद्दल आमचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे योग्य वेळी योग्य विचार मांडतील. काँग्रेसची अवस्था सांभाळण्यासाठी जी इच्छाशक्ती लागते ती काँग्रेसकडे राहिली आहे का? याचा विचार काँग्रेसने केला पाहिजे. मुंबई मनपाची निवडणूक जर स्वतंत्र लढण्याची वेळ आली तर ठाकरे गट आणि मनसे एकत्र येत निवडणूक लढवण्याचे निश्चय झालेला आहे. यावर उद्धव ठाकरे अंतिम निर्णय घेतील, असे राऊत म्हणाले.

## पार्थ पवारांचे लोकेशन काढा



■ **पुणे :** मुंढव्यातील बॉटनिकल गार्डन जमीन प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आक्रमक पवित्रा घेत थेट उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पुत्र पार्थ पवार यांना लक्ष्य केले आहे.

या प्रकरणात पार्थ पवार यांचा नेमका सहभाग काय हे तपासण्यासाठी, घटनेच्या दिवशी दुपारी १ ते सायंकाळी ४:३० या वेळेत त्यांचे मोबाईल 'टॉवर लोकेशन' आणि 'सीडीआर' (कॉल डेटा रेकॉर्ड) तपासण्यात यावेत, अशी मागणी दमानिया यांनी केली आहे. तसेच, या गंभीर प्रकरणी अजित पवार यांनी राजीनामा द्यावा, या मागणीवर त्या ठाम आहेत.

पत्रकार परिषदेत बोलताना अंजली दमानिया यांनी आरोपी सूर्यकांत येवले याला मिळालेल्या जामिनावर संशय व्यक्त केला. त्या म्हणाल्या, जर येवलेला कोठडीत ठेवून त्याचा जबाब नोंदवला असता, तर पार्थ पवार आणि त्यांच्या कंपनीचे नाव उघड झाले असते. हे सत्य बाहेर येऊ नये म्हणूनच येवलेला जामीन मंजूर झाला आहे. पोलिसांनी आता तातडीने न्यायालयात जाऊन येवलेचा जामीन अर्ज रद्द करावा आणि त्याला अटक करून या प्रकरणाच्या मुख्य सूत्रधाराचे नाव वदवून घ्यावे, असे थेट आव्हानच दमानिया यांनी पोलिसांना दिले.

यावेळी दमानिया यांनी पोलिस डायरीतील नोंदींचे वाचन करून गंभीर बाबी समोर आणल्या. त्या म्हणाल्या, आता अजित पवारांना राजीनामा द्यावाच लागेल. कारण पोलिस स्टेशन डायरीतले उल्लेख मी तुम्हाला वाचून दाखवते आहे. १६ जून २०२५ दुपारी ४ वाजून २८ मिनिटांनी उपरोक्त विषयान्वये आम्ही मुंढवा पोलिस ठाण्यात कर्तव्यावर हजर असताना मुंढवा पोलिस ठाण्यात हे कळवण्यात आलं की ॲड. तृप्ती ठाकूर यांनी फोन करुन आमच्या सिक्युरीटी लोकांना बॉटनिकल गार्डनमध्ये येऊ देत नाहीत त्यामुळे पोलिसांची कुमक पाठवा. अधिकाऱ्यांच्या आदेशाने आम्ही उपनिरीक्षक मुंडे यांच्यासह सदर ठिकाणी गेलो. त्यावेळी बॉटनिकल गार्डनचे प्रमुख बाळासाहेब कदम (वय-५७), महेश पुजारी आणि फिल्ड ऑफिसर सेफ सिक्युरिटी सर्व्हिसेस यांचे चार गार्ड हजर होते. त्यांनी आम्हाला सांगितलं की उमेश मोरे यांनी नियुक्ती केली आहे. पण ती जागा बोटॅनिकल गार्डनच्या ताब्यात असल्याने बाळासाहेब कदम यांनी सांगितलं. अमेडियाच्या लोकांनी जो व्यवहार केला त्यांनी पोलिसांना फोन केला. जागा रिकामी करुन घ्या अशी मागणी करतात. बॉटनिकल गार्डनच्या जागेवर 'अमेडिया' कंपनीने हक्क सांगत जागा रिकामी करण्यासाठी दबाव टाकला होता. या कंपनीच्या वकिलाने फोन करून पोलिसांची फौज बोलावून घेतली. मात्र, पोलिस घटनास्थळी पोहोचले असता, कंपनीच्या माणसांकडे जागेची कोणतीही कागदपत्रे नव्हती. तरीही कंपनीचे वकील आणि बाऊन्सर्स यांनी तिथे जाऊन दादागिरी केली, असा आरोप दमानिया यांनी केला.

# सरकारचा पवारांच्या 'उद्योगी' मुलाला वाचवण्याचा प्रयत्न
# भूखंड प्रकरणात केवळ चौकशीचा फार्स

### काँग्रेस, ठाकरे गटाचा सरकारवर आरोप





■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** पुण्यातील मुंढवा भूखंड प्रकरणात सरकारने केवळ चौकशीचा फार्स केला. या प्रकरणी अजित पवार यांच्या उद्योगी मुलाला वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनीही या प्रकरणी सरकारवर निशाणा साधला आहे. पार्थ पवार यांची त्यांच्या कंपनीत तब्बल ९९ टक्के भागीदारी आहे. त्यानंतरही त्यांचे या प्रकरणात नाव नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ संचलाक असलेल्या अमेडिया कंपनीने कोरेगाव पार्क परिसरातील महार वतनाची ४० एकर जमीन खरेदी केल्याचा प्रकार काही दिवसांपूर्वी उजेडात आला होता. कंपनीच्या वतीने भागीदार दिग्विजय पाटील व कुलमुखत्यारपत्र धारक शीतल तेजवानी यांच्यात दस्त नोंदणीचा व्यवहार झाला होता.

या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उपमहानिरीक्षक राजेंद्र मुठे यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने आपल्या अहवालात केवळ शीतल तेजवानी व दिग्विजय पाटील यांच्यावर ठपका ठेवला आहे. यावरून विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे.

या प्रकरणी काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, पुणे जमीन प्रकरणी जनतेला जो संशय होता तो खरा ठरला. सरकारने फक्त चौकशीचा फार्स केला. या समितीवरच आम्ही प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. सरकार जी समिती नेमते त्यातून क्लिनचीट देण्याचाच उद्योग केला जातो. पुणे प्रकरणात उपमुख्यमंत्र्यांच्या उद्योगी मुलाला वाचवण्याची सरकारची इतकी का धडपड सुरू आहे? पुण्याच्या जमिनीची न्यायिक चौकशी व्हायला हवी. पार्थ पवार याची कंपनी असून त्याच्यावर कारवाई होत नाही यातून चुकीचा पायंडा पडत आहे. भविष्यात हवी ती जमीन मंत्र्यांचे नातेवाईक लुटतील आणि सरकार क्लिनचीट वाटत बसेल हे थांबले पाहिजे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार तथा विधान परिषदेतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही या प्रकरणी सरकारवर निशाणा साधला आहे. पार्थ पवार यांचा त्यांच्या कंपनीत भागीदारी ९९ टक्के आहे. ज्यांची एवढी मोठी भागीदारी आहे त्यांचे नाव यात येत नाही. महाराष्ट्रात सरकारने सगळ्यांना अशाच प्रकारे न्याय दावा. याच्यामध्ये जो न्याय पार्थ पवारांना लावला तो इतरांनाही द्यावा लागेल, असे ते म्हणालेत.

## भाजपचा बिग गेमप्लॅन उघड!

### फडणवीस मैदानात : ४० स्टार प्रचारकांची फौज सज्ज

■ **दीपक कैतके, मुंबई, दि. १९ :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येताच राजकीय वातावरण अक्षरशः पेटलं आहे.

पण या तापलेल्या रणांगणात सर्वाधिक लक्ष वेधून घेतलं ते भाजपच्या अचानक मास्टरस्ट्रोकने! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः प्रचारासाठी मैदानात उतरणार, आणि ३० नोव्हेंबरपर्यंत रोज तब्बल तीन सभा– पण ही फक्त सुरुवात आहे.



भाजपने यावेळी ज्या प्रमाणात तोफखाना रंगेत लावला आहे, ते पाहून विरोधकही गोंधळले आहेत. निवडणूक आयोगाने स्टार प्रचारकांची मर्यादा एकदम २० वरून ४० केली आणि क्षणाचाही विलंब न लावता भाजपने आपली फायर पॉवर जाहीर केली. फडणवीस, नितीन गडकरी, रवींद्र चव्हाण, पीयूष गोयल, विनोद तावडे, शिवप्रकाश–सर्वच दिग्गजांची सरळ मैदानात एन्ट्री झाली आहे.

यापुढे राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींसाठी होणाऱ्या निवडणुकीत भाजप नेमकं काय साधू पाहत आहे? विशेष म्हणजे, अनेक ठिकाणी पक्षाने मित्रपक्षांना न साथ देता ह्रस्वबळाह्नचा निर्णय घेतला आहे. बिहार निवडणुकीतील यशानंतर पक्षाचा आत्मविश्वास कमालीचा वाढलेला दिसतोय.

स्टार प्रचारकांच्या यादीनं तर सगळ्यांचंच लक्ष वेधलं आहे. चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, चंद्रशेखर बावनकुळे यांसारखी अनुभवी नावे तर आहेतच; पण पंकजा मुंडे, नितेश राणे, आशिष शेलार, शिवेंद्रराजे भोसले यांसारखे आक्रमक चेहरेही यात झळकत आहेत.

अल्पसंख्याक समाजातील इद्रिस मुलतानी आणि माजी खासदार अमर साबळे यांनाही महत्त्वाची जबाबदारी–यातून भाजपचा साइलंट टार्गेट काय आहे, याची चर्चाच सुरु झाली आहे.

२ डिसेंबरला मतदान आणि लगेच दुसऱ्या दिवशी निकाल. वेळ कमी, पण भाजपचा वेग अफाट. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपताच ४० नेत्यांचा हा प्रचार मोर्चा राज्यभर धडाक्यात उतरणार आहे.

ही ४० जणांची भव्य फौज आणि फडणवीसांचा तुफानी दौरा म्हणजेच भाजपचे मिशन इलेक्शन विरोधकांच्या समीकरणात भूकंप घडवणार का? उत्तर काहीही असो पण पुढचे काही दिवस थरारक ठरणार, हे नक्की!

## मृताच्या नावे काढला पगार

■ **वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. १९ :** केंद्र शासनाकडून आश्रमशाळेसाठी मिळालेल्या अनुदानात तब्बल २ कोटी ४८ लाख रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मयत कर्मचाऱ्याच्या नावे पगार लाटणे आणि निधी खाजगी खात्यात वळवल्याप्रकरणी समाजकल्याण विभागाचे सहायक लेखाधिकारी संदीप हरिभाऊ देठे यांनी दिलेल्या फियार्दीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात संस्थेच्या अध्यक्षासह सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संस्थेने २०१५ ते २०२० या कालावधीत केंद्रशासनाच्या पोर्टलद्वारे केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेसाठी अनुदान मिळवले होते. शासनाने संस्थेच्या खात्यावर २ कोटी ४८लाख २१ हजार ४२४ रुपये जमा केले होते. हा निधी कर्मचाऱ्यांचे वेतन आणि शाळेच्या भौतिक सुविधांवर खर्च होणे अपेक्षित होते. मात्र, संगनमत करून हा निधी शाळेसाठी न वापरता, तो नातेवाईकांच्या खात्यावर परस्पर वळवला.

## भारताला हिंदू राष्ट्र घोषित करणे आवश्यक नाही



संघाची निर्मिती कोणाचाही विरोध करण्यासाठी किंवा त्याला हानी पोहोचवण्यासाठी नाही, तर चारित्र्य घडविण्यासाठी आणि भारताच्या जागतिक नेतृत्वात योगदान देण्यासाठी झाली आहे. विविधतेमध्ये भारताला एकत्र आणण्यासाठी संघ ही एक पद्धत आहे.

**मोहन भागवत**
RSS चीफ

■ **वृत्तसंस्था, गुवाहाटी, दि. १९ :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी म्हटले की, भारत आणि हिंदू एकच आहेत. भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्याची गरज नाही; त्याची संस्कृती आधीच ते प्रतिबिंबित करते.

गुवाहाटी येथील एका कार्यक्रमात बोलताना भागवत म्हणाले की, ज्याला भारताचा अभिमान आहे तो हिंदू आहे. हिंदू धर्म हा केवळ एक धार्मिक शब्द नाही तर हजारो वर्षांच्या सांस्कृतिक परंपरेत रुजलेली एक सभ्यता ओळख आहे.

आरएसएस प्रमुख सोमवारी आसामची राजधानी गुवाहाटी येथे तीन दिवसांच्या दौऱ्यावर गेले. बुधवारी भागवत यांनी युवा अधिवेशनाला संबोधित केले. त्यानंतर ते २० नोव्हेंबर रोजी मणिपूरला रवाना होतील.

आसाममधील लोकसंख्याशास्त्रीय बदलाबद्दल मोहन भागवत म्हणाले, आपण आत्मविश्वास, दक्षता आणि आपल्या भूमी आणि संस्कृतीशी दृढ आसक्ती राखली पाहिजे. समाजातील सर्व घटकांनी निःस्वार्थपणे एकत्र काम केले पाहिजे. त्यांनी ईशान्येकडील भाग हे भारताच्या विविधतेतील एकतेचे एक ज्वलंत उदाहरण असल्याचे वर्णन केले. ते म्हणाले की, लचित बोरफुकन आणि श्रीमंत शंकरदेव यांसारख्या व्यक्ती केवळ प्रादेशिकच नव्हे तर राष्ट्रीय महत्त्वाच्या आहेत आणि सर्व भारतीयांना प्रेरणा देतात.

## स्थानिक निवडणुकीच्या रणधुमाळीत ५ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच ५ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले.

या आदेशानुसार, सध्या पुण्यातील यशदा येथे उपमहासंचालक पदावर कार्यरत त्रिगुण कुलकर्णी यांची नियुक्ती शिक्षण बोर्डाच्या अध्यक्षपदी करण्यात आली आहे.

त्रिगुण कुलकर्णी यांच्यासोबतच राहुल रंजन महिवाल, प्रकाश खपले, डॉ. मंजिरी मानोलकर, अंजली रमेश या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

राहुल रंजन महिवाल यांची महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे येथील व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रकाश खपले आयुक्त, मृदा आणि जलसंधारण, छत्रपती संभाजी नगर यांची महाराष्ट्र राज्य मत्स्यव्यवसाय महामंडळ, मुंबई येथील व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.


डॉ. मंजिरी मानोलकर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे यांची आयुक्त, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

त्रिगुण कुलकर्णी उपमहासंचालक, यशदा, पुणे यांची अध्यक्ष, एसएससी आणि एचएससी बोर्ड, पुणे येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

अंजली रमेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांची आयुक्त, मृदा आणि जलसंधारण, छत्रपती संभाजी नगर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## बिबट्या नरभक्षक झाल्यास गोळ्या घालणार

### शाळेच्या वेळा बदलणार : संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिकमध्ये दहशतीमुळे राज्याचा केंद्राला प्रस्ताव



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** राज्यात बिबट्यांच्या मानवावरील हल्ल्यांची समस्या राज्य आपत्ती म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीत मांडावा. तसेच बिबट्यांना वन्यजीव संरक्षण अधिनियमाच्या शेड्यूल-१ मधून वगळून शेड्यूल-२ मध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्ताव सादर करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

नरभक्षक बिबट्यांवर नियंत्रणासाठी आवश्यक ठिकाणी पिंजरे बसवावेत, असेही निर्देश त्यांनी मंगळवारी मंत्रालयातील बैठकीत दिले. दरम्यान, नरभक्षक बिबट्यांना यापुढे गोळ्या घालून ठार करण्याचा प्रस्ताव असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांना सांगितले.

**वर्षभरात अहिल्यानगरात ११ तर नाशिक जिल्ह्यात ८ बळी**

अहिल्यानगर जिल्ह्यात बिबट्यांच्या हल्ल्यात मागील तीन वर्षांत १९ जणांचा मृत्यू झाला असून तब्बल १३६ जण गंभीर जखमी झाले आहेत. यात चालू वर्ष २०२५ मध्ये ११ जणांचा मृत्यू झाला आहे. नाशिक जिल्ह्यात या वर्षात बिबट्याने आठ जणांचा बळी घेतला आहे, तर विदर्भात चालू वर्षात एकाचा बळी घेतला आहे.

पुणे जिल्ह्यात जुन्नरसह काही वनपरिक्षेत्रातही बिबट्यांची संख्या वाढलेली असून बिबट्याकडून ग्रामस्थांवर हल्ले केले जात आहेत. त्यामुळे नागरिक भयभीत आहेत.

**अधिसूची १ मध्ये गोळ्या घालण्यास मनाई**

यामध्ये धोक्यात असलेल्या वन्यजीव प्रजातींचा समावेश. या अनुसूचीनुसार सूचिबद्ध प्रजातींची शिकार, ठार मारण्यास मनाई. केवळ विशेष परवानगीनेच ठार मारता येते. पण प्रक्रिया किचकट. या सूचीत काळे हरण, हिम बिबट्या, हिमालयीन अस्वल आणि आशियाई बिबट्याचा समावेश.

आपल्याकडील बिबटे आशियाई गटातील आहेत. या अनुसूचीतून बिबट्यांची प्रजाती वगळल्यास राज्य सरकारला नरभक बिबट्याला गोळी घालून ठार करणे अवघड नसेल. केंद्राच्या परवानगीची गरज नसेल.

**नगरमध्ये ९.३० ते ४ पर्यंतच शाळा**

बिबट्याची दहशत असलेल्या परिसरातील शाळांच्या वेळापत्रकात बदल करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत, जेणेकरून विद्यार्थी अंधारापूर्वी घरी जावेत. अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी शाळांच्या वेळात बदल करण्याचा निर्णय घेतला. शाळांची नियमित वेळ सकाळी साडेदहा ते पाच अशी आहे. पण बिबटप्रवण आपत्ती क्षेत्रातील शाळांच्या वेळा सकाळी साडेनऊ ते दुपारी चार वाजेपर्यंत निश्चित केली. वेळेत बदल करण्याचा निर्णय शाळा व्यवस्थापन समिती करणार आहे.

## 'ऑपरेशन कमळ' सुरुच राहणार!

### शिंदे गटाच्या नाराजीकडे दुर्लक्ष : भाजपचे स्पष्ट संकेत



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्ताने भाजपने मित्रपक्षांच्या पदाधिकाऱ्यांना प्रवेश देण्याचा धडाका लावला आहे. या प्रकरणी शिंदे गटाच्या मंत्र्यांनी मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार टाकला. तसेच त्यासंबंधीची तक्रार मुख्यमंत्र्यांकडेही केली.

मुख्यमंत्र्यांनी यापुढे मित्रपक्षांना एकमेकांचे पदाधिकारी फोडण्यापासून दूर राहण्याचे निर्देश दिले. पण त्यानंतरही भाजपने पक्षविस्ताराचे आपले प्रयत्न सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

महाराष्ट्रात सध्या नगरपालिका व नगरपरिषदेच्या निवडणुकांचा फड रंगला आहे. त्यातच भाजप व शिंदे गटातील शीतयुद्ध चव्हाट्यावर आले आहे. भाजपच्या फोडाफोडीच्या राजकारणाला कंटाळून शिंदे गटाच्या मंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीवर कथितपणे बहिष्कार टाकला. त्यानंतर त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या समवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्याकडे आपले गाऱ्हाणे मांडले. पण मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेनेच फोडाफोडीच्या राजकारणाला सुरुवात केल्याचा दावा करत त्यांचे कान उपटले.

यावेळी त्यांनी भाजपसह मित्रपक्षांना फोडाफोडीच्या राजकारणापासून दूर राहण्याचाही सल्ला दिला. पण भाजप आता रिव्हर्स गियर टाकण्याच्या मनस्थितीत नसल्याचा दावा सूत्रांनी केला आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपने कल्याण - डोंबिवलीत ऑपरेशन कमळ राबवले. त्यानंतर आता भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आपल्या पक्षात इनकमिंग सुरुच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. आगामी काळात भाजपमध्ये राज्यभरातून इनकमिंग सुरू राहील. यात शिवसैनिकांचा मोठा समावेश असेल. सूत्रांच्या मते, साडेचार हजार शिवसैनिक भाजपच्या संपर्कात आहेत. हा एक मोठा आकडा असल्यामुळे शिंदे गटाच्या पोटात गोळा उठला आहे. यातूनच कालचे नाराजीनाट्य घडल्याचे सांगण्यात येत आहे.

मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतरही भाजप प्रदेशाध्यक्षांनी संपूर्ण राज्यात ऑपरेशन कमळ राबवण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे भाजप व शिंदे गटातील तणाव अधिक वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निदेर्शांनुसार, भाजपने आपल्या कुबड्या दूर करण्याच्या दिशेने पाऊल उचलले का? हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे नेते व पदाधिकारी सातत्याने फोडले जात आहेत. राज्यातील अनेक ठिकाणी शिवसेनेच्या राजकीय वाटचालीला अडचणीचे ठरतील असे पक्षप्रवेश केले जात आहेत.

त्यातच भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत मंगळवारी कल्याण - डोंबिवलीतील शिवसेनेचे दिवंगत नेते वामन म्हात्रे यांचे सुपुत्र अनमोल म्हात्रे व त्यांच्या पत्नी अश्विनी म्हात्रे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्यासोबत शिवसेनेच्या शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपचे कमळ हाती घेतले. हा घटनाक्रम एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

## मुंबई, ठाणे, नाशिक, सोलापूर, धुळेसह राज्यात सीएनजी तुटवडा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** मुंबईसह राज्यभरात सीएनजीचा तुटवडा जाणवत असून मुंबई, ठाण्यात सीएनजी पंपांवर मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशीही लांब रांगा लागल्या, मुख्य गॅस पाइपलाइनला झालेल्या नुकसानीमुळे पुरवठा खंडित झाल्याने वाहनांना इंधन भरण्यास अडथळा निर्माण झाला.

महानगर गॅस लिमिटेडद्वारे (एमजीएल) चालवल्या जाणाऱ्या बहुतेक सीएनजी पंपांवर सकाळपासूनच लांब रांगा लागल्या होत्या, विशेषतः काळ्या-पिवळ्या टॅक्सी आणि ऑटोरिक्षांच्या, अनेक चालकांना नेहमीच्या १५ ते ३० मिनिटांच्या तुलनेत तीन ते चार तास वाट पाहावी लागत होती. नाशिक,सोलापूर,धुळे शहरात सीएनजीचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स (आरसीएफ) कंपाउंडमधील गेलच्या मुख्य पुरवठा पाइपलाइनमध्ये बिघाड झाल्याने हा प्रकार घडला, असे महानगर गॅस लिमिटेडने सांगितले.




नाशिक,धुळ्यात पुरवठा विस्कळीत : महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडकडून (एमएनजीएल) पुरेसा पुरवठा होत नसल्याने नाशिक शहरात आठवडाभरापासून सीएनजी इंधनाचा तुटवडा आहे. टँकरद्वारे पुरवठा होणाऱ्या प्रत्येक ऑफलाइन पंपावर किमान १२०० किलोची मागणी असतांना केवळ ३०० ते ४०० किलोचा पुरवठा तोही अनिश्चित असतो. धुळे येथे ४ सीएनजी पंप आहे. चार दिवसांपासून पुरवठा झालेला नाही. तर शहरात २० आणि जिल्ह्यात २०० पेक्षा जास्त पेट्रोल-डिझेल पंप आहेत.

पेट्रोल डीलर्स असोसिएशनच्या म्हणण्यानुसार, मुंबईत सुमारे १५० सीएनजी पंप आहेत. सोमवार सकाळपासून कमी गॅस प्रेशरमुळे अनेक पंप बंद आहेत. काही ॲप-आधारित कॅब पेट्रोलवर स्वीच केल्या, पेट्रोलचा पर्याय काढून टाकणाऱ्या बहुतेक काळ्या-पिवळ्या टॅक्सींवर कोणताही परिणाम झाला नाही आणि त्यांना काम थांबवावे लागले.

सोलापुरात आयएमसी कंपनीकडून सीएनजी पुरवठ्यात दोन दिवसांपासून खंड पडला आहे. तब्बल १४ हजार ८३४ वाहने गॅसअभावी पेट्रोलवर धावत आहेत.

दररोज १०० मेट्रिक टन सीएनजीची गरज असताना कंपनीकडून निम्माच पुरवठा सुरू आहे. मंगळवारी शहरातील तब्बल ३ हजार रिक्षांसाठी गॅस उपलब्ध नव्हता.

# धमकीनंतर पतीचा हृदयविकाराने मृत्यू

**पत्नीचा आरोप ; राजापेठ पो.स्टे.मध्ये गुन्हा दाखल**

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.19 )** – राजापेठ पोलिस स्टेशन परिसरातील धन्वंतरी गली क्रमांक 1 येथे आरोपींच्या धमक्यांमुळे तणावग्रस्त असलेल्या एका तरुणाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. पत्नीने राजापेठ पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी 60 वर्षीय वृद्धाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

महिलेने तिच्या तक्रारीत म्हटले आहे की, आरोपी तिच्या सासरच्या लोकांशी गोदामात सामान ठेवण्यावरून वाद घालत असे. तिच्या पतीला आणि सासूला गोदामात सामान ठेवण्यावरून तिच्यासमोर धमकावले आणि येथे सामान आणू नका, असे सांगितले. एके दिवशी गाडी घेऊन गेले असता त्याने तिच्या पतीला शिवीगाळ करीत येथे तू कसा व्यवसाय करतो ते पाहतो,असे धमकावले. त्याने अश्लील भाषा वापरत आणि तुझ्यासह तुझ्या मुलांना उद्ध्वस्त करण्याची धमकी दिली. त्यानंतर, तक्रारदार महिला आणि तिचा पती घरी परत आले. तिच्या पतीची तब्येत अचानक बिघडली. रुग्णालयात नेले असता त्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता. आरोपींमुळे निर्माण झालेल्या तणावामुळे तिच्या पतीचा मृत्यू झाल्याचा दावा करीत महिलेने राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपींविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# जंगलात नव दाम्पत्याची गळफास घेऊन आत्महत्या

**गर्भवती पत्नीचा मृत्यू, परिसरात खळबळ**

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, दि. 19 )** धारणी तालुक्यातील कारला परिसरातील तलावाजवळील जंगलात नव दाम्पत्याचा झाडाला लटकलेल्या अवस्थेत संशयास्पद स्थितीत मृतदेह आढळून आले. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, ही आत्महत्या की घातपात याबाबत विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. मृतांमध्ये गोबरकहू येथील विलास हरिराम बेठेकर (वय 26) व त्यांची पत्नी वैशाली विलास बेठेकर (वय 19) यांचा समावेश आहे.

धारणी तालुक्यातील कारादा येथील तलावाजवळील जंगलात गोबरकहू येथील नवतरुण दाम्पत्याने गळफास घेऊन



आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. गावापासून सुमारे 4 किलोमीटर अंतरावर असलेल्या या ठिकाणी 16 नोव्हेंबर रोजी संध्याकाळी सुमारे 5.30 वाजता बकऱ्या चारण्यासाठी गेलेल्या एका मुलास दोघांचेही मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत दिसले. त्याने तत्काळ गावात येऊन माहिती दिल्यानंतर ही घटना प्रकाशात आली. माहिती मिळताच जमादार मनोज लढे यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. मृतदेह ताब्यात घेऊन उपजिल्हा रुग्णालय, धारणी येथे पोस्टमार्टमसाठी पाठविण्यात आले. ठाणेदार अवतारसिंह चौहान यांनी ग्रामस्थांकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, कुणीही या प्रकरणात बोलण्यास पुढे येत नाही. तरीही, तपासादरम्यान दाम्पत्यामध्ये काही दिवसांपासून वाद होत असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी सध्या मर्ग दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

**पत्नी होती गर्भवती**

एकाच वेळी पती-पत्नीने जंगलात जाऊन गळफास घेतल्याची घटना अत्यंत गंभीर असून, मृत वैशाली ही गर्भवती असल्याची माहितीही समोर आली आहे. त्यामुळे या घटनेची चर्चा दोन दिवस उलटूनही थांबलेली नाही. पुढील तपासातून मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे.

# संविधान चौकात युवकाची हत्या

**बुलेटवर आलेल्या तीन हल्लेखोरांनी केला हल्ला**

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.19 )**– शहराच्या मध्यवर्ती संविधान चौक परिसरात बुधवारी सायंकाळी घडलेल्या एका धक्कादायक घटनेत यश रवींद्र पाटणकर या युवकाची चाकूने वार करून हत्या करण्यात आली. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यश आपल्या घरासमोर गिट्टी उचलण्याचे काम करत होता. त्याचवेळी बुलेट मोटारसायकलवर तिन युवक तेथे पोहोचले. कोणताही वाद, बोलाचाली न करता तिघांनी अचानक यशवर तुटून पडत सलग चाकू वार केले. हल्ल्यानंतर आरोपी वेगाने मोटारसायकलवर बसून पळून गेले. गंभीर जखमी अवस्थेत यशला तत्काळ जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतक यश पाटणकर याच्यावर तीन महिन्यांपूर्वीच भारतीय दंड संहितेची कलम 307 (खुनाचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा दाखल होता. त्यामुळे ही हत्या जुन्या वैमनस्यातून झाल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही तपासण्यास सुरुवात केली असून हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी तपास पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहरात वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

# दुचाकी-ट्रकची धडक ; विद्यार्थ्याचा मृत्यू

**अमरावती– मुर्तीजापूर ‘टी पॉइंट’ वरील घटना**



महासागर | प्रतिनिधी

**दर्यापूर ( दि. 19 )** – दर्यापूर येथील क्रीडा संकुल मैदानावरून मित्राच्या दुचाकीवर बसून जात असताना दुचाकी व ट्रकच्या अपघातात एका विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दर्यापूर-मूर्तिजापूर मार्गावरील बस आगारा जवळ घडली.

शिवराज प्रदीप राळे (वय 14 रा. सोनखेड) हा विद्यार्थी दर्यापूर येथील एकविरा शाळेत नववीत शिक्षण घेत होता. रोज सकाळी तो क्रीडा संकुल मैदानावर खेळण्या करिता जात होता. बुधवारी पहाटे उठून शिवराज क्रीडा संकुल येथे हॉलिबॉल, फुटबॉल खेळण्याकरिता गेला. खेळणे झाल्यावर मैदानावरून तो मित्राच्या दुचाकीने घरी जाण्यास निघाला होता. दरम्यान बांधकाम विटांनी भरलेला एम एच 27 ?क्स 1308 क्रमांकाचा मिनी ट्रक व एम एच 30 ए डी 4917 क्रमांकाची दुचाकीची धडक झाली. शिवराज दुचाकीवर मागे बसला होता. अपघातात शिवराजच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना सकाळी 8 वाजतादरम्यान दर्यापूर-मूर्तिजापूर मार्गावरील बस आगारा जवळ घडली. अपघात होताच रुग्णसेवक गोपाल पाटील अरबट, प्रदीप मलीये यांनी रुग्णवाहिकेतून शिवराजला उपजिल्हा रुग्णालय दर्यापूर या ठिकाणी दाखल केले होते. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. शिवराज राळे याचे वडील शिक्षक असून, मुलाला चांगले शिक्षण मिळावे याकरिता ते दर्यापूर येथील डॉ. पंजाबराव कॉलोनी, अवधूत नगर येथे भाडेकरू म्हणून राहत होते. शिवराज राळे याला एक मोठी बहीण सुद्धा आहे. नातेवाईकांनी उपजिल्हा रुग्णालयात मोठी गर्दी केली होती. दर्यापूर पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून ट्रक ताब्यात घेतला आहे.

# ग्रामीण भागात उत्साह मंदावला

**शहरांमध्ये राजकीय वातावरण तापले**



महासागर | प्रतिनिधी

**पथ्रोट, ( दि.19 )**– तालुक्यातील ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीची शक्यता व्यक्त होत होती. त्यामुळे इच्छुकांनी गावोगावी मोठ्या प्रमाणात संपर्क मोहीमा सुरू केल्या होत्या. लग्नसमारंभ, वाढदिवस, धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, खेळ स्पर्धा अशा प्रत्येक ठिकाणी हे इच्छुक सक्रिय दिसत होते. मात्र अचानक नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीची घोषणा झाल्याने जिल्हा परिषदेसाठी तयारी करणाऱ्या इच्छुकांमध्ये काहीसा भ्रमनिरास झाल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

नगरपालिका निवडणूक जाहीर झाल्यानंतर शहरांमध्ये राजकीय तापमान चांगलेच वाढले आहे. पक्षीय स्तरावर हालचाली सुरू झाल्या असून उमेदवारांच्या चर्चेला वेग आला आहे. पण याउलट ग्रामीण सर्कल आणि गण पातळीवर मात्र शांतता दिसत आहे. जिल्हा परिषदेची निवडणूक ग्रामीण भागासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात असल्याने अनेक इच्छुकांनी खर्च, वेळ आणि सामाजिक संपर्क यावर मोठी गुंतवणूक केली होती. आता निवडणूक पुढे ढकलल्याने त्यांचा उत्साह थंडावल्याची नाराजी काही ठिकाणी दिसून येते.

**ग्रामीण भागात संपर्क वाढविण्यास ब्रेक**

महायुती असो किंवा विरोधक, दोन्ही गटांमध्ये जिल्हा परिषदेची तयारी जोरात होती. परंतु आता नगरपरिषदेच्या निवडणुकीमुळे पक्षांनी प्राथमिकता बदलली आहे. अनेक कार्यक्रम, भेटी-कार्यक्रम आणि भेटवस्तूंचे वाटप या सर्वांना तात्पुरता ब्रेक बसला आहे.

**नगरपालिका निवडणुकीनंतर पुन्हा रणशिंग**

नगरपालिका निवडणूक 2 डिसेंबर रोजी होत आहे. या निवडणुका संपल्यानंतरच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यानंतर ग्रामीण भागातली राजकीय हालचाल पुन्हा वेग धरणार असून इच्छुकांचे रणशिंग पुन्हा फुंकले जाणार आहे. सध्या मात्र शहरांमध्ये राजकारण गरम झाले असले तरी ग्रामीण राजकारण तात्पुरते शांत झाल्याचे चित्र दिसत आहे.

# दोन नगराध्यक्ष, पाच नगरसेवक पदाचे अर्ज मागे

**नगरपंचायत-नगरपरिषद निवडणूक**

**छाननीनंतर वैध अर्जांची संख्या जाहीर**

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 19 )** जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीत छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर 19 नोव्हेंबर 2025 रोजी वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रांची संख्या जाहीर झाली. दरम्यानच जिल्ह्यातील अचलपूरात नगराध्यक्षाच्या दोन उमेदवाराने अर्ज मागे घेतला असून, अचलपूर 1, मोर्शी 3 आणि दर्यापूर 1 अशा उमेदवारांनी सदस्य पदाचा अर्ज मागे घेतला आहे.

छाननीनंतर जिल्ह्यातील 12 शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकूण वैध अर्जांची पडताळणी करण्यात आली. त्यापैकी काही ठिकाणी अध्यक्ष आणि सदस्य पदांसाठी अर्जदारांनी नामनिर्देशन मागे घेतले आहेत. चांदूर बाजार येथे अध्यक्ष पदासाठी 7 आणि सदस्य पदासाठी 111 अर्ज वैध ठरले असून कोणतेही अर्ज मागे घेण्यात आलेले नाही. दर्यापूर येथे अध्यक्षपदासाठी 7 आणि सदस्य पदासाठी 127 वैध आहे. चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धारणी, धामणगाव, वरुड, अंजनगाव सुर्जी, शेंदूरजनाघाट, मोर्शी आणि चिखलदरा येथे वैध अर्जांची नोंद झाली. परंतू अचलपूरात 16 पैकी 2 उमेदवारांनी नगराध्यक्ष पदाचे नामांकन मागे घेतले असून, दर्यापूरात 127 पैकी एका उमेदवाराने अर्ज मागे घेतला आहे. त्याचप्रमाणे अचलपुरात 314 पैकी 1 सदस्य, मोर्शीत 153 पैकी 3 सदस्यांनी अर्ज मागे घेतले आहे. आता जिल्ह्यातील मतदारसंघांमध्ये निवडणुकीची रंगत वाढत असून उमेदवार प्रचारयुद्धाची तयारी करत असल्याचे दिसत आहे.

# अल्पवयीन मुली, महिलांवरील अत्याचारांची वाढ

**ग्रामीण भागात एकाच दिवशी चार गुन्हे दाखल**

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.19 )**– जिल्ह्यातील ग्रामीण भागात महिलांवरील अत्याचार, छेडछाड आणि अल्पवयीन मुलींवरील गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. 18 नोव्हेंबर रोजी चिखलदरा, वरुड, सरमसपूरा आणि पथ्रोट पोलिस ठाण्यात एकाच दिवशी असे चार गुन्हे दाखल झाले.

चिखलदऱ्यातील पहिल्या प्रकरणात 13 वर्षीय शाळकरी मुलगी बसने घरी जात असताना एका 27 वर्षीय तरुणाने तिचा हात धरून विनयभंग केला. यासंदर्भात पीडितेच्या वडिलांनी तक्रार दाखल केली असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

वरुड परिसरातील दुसऱ्या प्रकरणात, 17 वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत 24 वर्षीय आरोपी प्रेमसंबंध प्रस्थापित करून लिव्ह-इनमध्ये राहू लागला. अल्पवयीन मुलगी सात महिन्यांची गर्भवती झाल्यानंतर रुग्णालयातून ही घटना समोर आली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

सरमसपूऱ्यातील तिसऱ्या घटनेत, 25 वर्षीय महिलेला लग्नाचे आमिष दाखवून ओळखीतील व्यक्तीने दीर्घकाळ शारीरिक संबंध ठेवले. लग्नास नकार देत तिला धमकावले म्हणून तिने तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवला.

चौथी घटना पथ्रोट परिसरात घडली. टिन फिटिंगचे काम करणाऱ्या 24 वर्षीय व्यक्तीने 36 वर्षीय महिलेशी लग्नाचे आश्वासन देत वारंवार शारीरिक संबंध ठेवले. नंतर लग्नास नकार देत शिवीगाळ आणि धमकी दिल्यावर पीडितेने तक्रार केली. आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सलग नोंदवलेल्या या चार प्रकरणांमुळे महिलांवरील अत्याचारात वाढ होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# निवडणुकीपूर्वी जिल्ह्यात 711 गुन्हेगारांवर कारवाई!



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, दि. 19 )** येत्या 2 डिसेंबरला होणाऱ्या नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीत कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई सुरू केली आहे. जिल्यातील 711 रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर विविध प्रतिबंधात्मक कारवाया हाती घेण्यात येत आहेत.

ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी मंगळवारी सर्व 32 पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कडक उपाययोजना करण्याचे त्यांनी निर्देश दिले. या कारवाईमुळे जिल्यातील संभाव्य आणि रेकॉर्डवरील गुन्हेगारांमध्ये चांगलाच धडकीचा माहोल निर्माण झाला आहे. पोलिसांनी निवडणुकीदरम्यान शांतता राखण्यासाठी सर्वात कठोर पातळीवर तयारी केली आहे.

**489 गुन्हेगारांवर आधीच कारवाई पूर्ण**

ग्रामीण पोलिसांनी मिळालेल्या माहितीनुसार, जिल्यातील 489 गुन्हेगारांवर विविध प्रतिबंधात्मक कलमांखाली कारवाई करण्यात आली आहे. यात अनेकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत, तर काहींवर बाँड घेण्याची कारवाईही पार पडली आहे. जिल्ह्यातील एका कुख्यात गुन्हेगाराविरोधात एमपीडीए अंतर्गत कारवाई प्रस्तावित असून त्याची प्रक्रिया सुरू आहे. या कायद्यानुसार व्यक्तीस दीर्घकाळ तुरुंगात ठेवण्याची तरतूद आहे.

**काही गुन्हेगारांना तडीपार करण्याची तयारी**

पोलिसांच्या माहितीनुसार, निवडणुकीदरम्यान सुरक्षा धोक्यात आणू शकणाऱ्या गुन्हेगारांना दोन दिवसांसाठी जिल्ह्याबाहेर तडीपार करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. संबंधित गुन्हेगारांची यादी अंतिम टप्प्यात असून लवकरच आदेश जारी होणार आहेत. एसपी विशाल आनंद यांनी सर्व ठाण्यांना 21 नोव्हेंबरपर्यंत प्रस्तावित गुन्हेगारांवरील कारवाईचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकाऱ्यासोबत शिवीगाळ**

**अमरावती, ( दि. 19 )** – मंगळवारी, तिवसा पोलीस स्टेशन परिसरातील गुरुदेव नगर येथे अतिक्रमण विरोधी मोहिमेदरम्यान, पाच जणांनी ग्रामपंचायत अधिकाऱ्याशी वाद घातला, त्यांना शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. ग्रामपंचायत अधिकारी जितेंद्र विधाते यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# नगर परिषद निवडणूकीत जिल्ह्यात घराणेशाहीचा उफाळा

**कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट**



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती ( दि.19 )**– नगरपरिषद निवडणूकीमध्ये नगराध्यक्ष पदाकरिता जिल्ह्यातील अनेक आमदारांच्या नातेवाईकांनी मोठ्या प्रमाणात उमेदवारी दाखल केली आहे, मात्र पक्षासाठी आपले जीवन खर्ची घालणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

नगरपरिषद निवडणुकीच्या अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी अमरावती जिल्ह्यात निवडणूक तापमान चांगलेच चढले. अध्यक्षपदासाठी तब्बल 126 आणि नगरसेवकपदासाठी 1,821 अर्ज दाखल होताच, जिल्ह्याची राजकीय सरगर्मी शिगेला पोहोचली. महायुतीतील तीनही पक्ष स्वतंत्रपणे मैदानात उतरत असल्याने अनेक ठिकाणी त्रिकोणी लढतीची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. मात्र, सर्वाधिक चर्चेत राहिला तो घराणेशाहीचा उफाळा आणि भाजप, शिवसेना, काँग्रेसमध्ये मधील तीव्र नाराजीचा सूर.

**भाजपमध्ये नाराजीचा भडका**

भाजपकडे उमेदवारांचा कल जास्त असला तरी महापौरपदासाठी ‘बाहेरच्या’व्यक्तीची निवड केल्याने कार्यकर्त्यांमध्ये अप्रसन्नता वाढली आहे. बिहार विधानसभा निकालांचा प्रभाव आणि सत्तेचे समीकरण पाहून इतर पक्षांतील कार्यकर्ते भाजपमध्ये आले असले, तरी संघटनातील जुने कार्यकर्ते मात्र नाराज असल्याचे दिसते. काँग्रेस मात्र शांतपणे, धोरणात्मक पद्धतीने तयारी करत असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील पाचही मतदारसंघात भाजपचे आमदार असल्यानं ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख 21 नोव्हेंबर, त्यानंतर खरी राजकीय रंगत दिसण्यास सुरुवात होणार आहे.

**नेत्यांच्या नातेवाइकांची दिमाखदार एन्ट्री**

जिल्ह्यातील धामणगावच्या नगराध्यक्ष पदासाठी आमदार प्रताप अडसाद यांची बहिण अर्चना रोठे यांची उमेदवारी तसेच दर्यापूरच्या नगराध्यक्ष पदासाठी भाजपकडून अकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे यांची पत्नी नलिनी भारसाकळे, काँग्रेसकडून सुधाकर भारसाकळे यांच्या पत्नी मंदाकिनी भारसाकळे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ आल्हाद कलोती यांना चिखलदरा येथून उमेदवारी देण्यात आली तसेच दर्यापूरचे आमदार गजानन लवटे यांचे पुत्र यश लवटे यांनाही अंजनगांव येथून उमेदवारी देण्यात आली. या पार्श्वभूमीवर घराणेशाहीचा प्रश्न जिल्ह्याच्या राजकारणात ठळकपणे पुढे आला आहे.

**चिखलदरा ठरला चर्चेचा केंद्रबिंदू**

हिल स्टेशन चिखलदऱ्यातील राजकीय घडामोडींनी सर्वांचे लक्ष वेधले आहे. संजय खोडके यांचे कट्टर समर्थक, माजी महापौर राजेंद्र सोमवंशी यांचा अचानक भाजप प्रवेश, काँग्रेसचे आदिवासी नेते सुनील चौथमल यांचा भाजपमध्ये प्रवेश आणि तातडीने उमेदवारी, नांदगाव खंडेश्वरमध्ये भाजपविरोधात बंडखोरी, अचलपूरमध्येही उमेदवारीवर मतभेद जिल्ह्यात चर्चेचा विषय आहे. धामणगाव रेल्वे, अचलपूर, चांदूर बाजार, चांदूर रेल्वे, वरुड, मोर्शी आणि शेघाट येथे मुख्य लढत भाजप-काँग्रेस यांच्यातच होण्याची दाट शक्यता आहे.

# दोन्ही मुहूर्त साधावे लागणार

# विवाह सोहळे व निवडणूक एकाच दिवशी!

**प्रशासनाची ‘आधी मतदान, मग लग्न’ची हाक**

**नितीन दुर्बूडे**

**पथ्रोट, ( दि. 19 )**– नगरपरिषद निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर 2 डिसेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. मात्र याच दिवशी वर्षातील महत्त्वाचा शुभमुहूर्त असल्याने अनेक कुटुंबांनी विवाहसोहळ्यांची मोठी तयारी केली आहे. परिणामी मतदानाच्या टक्केवारीवर याचा परिणाम होऊ शकतो का, याबाबत जनमानसात चर्चांना उधाण आले आहे.

अनेक कुटुंबे विवाहासाठी गावाबाहेर जाणार असल्याने आणि पाहुण्यांच्या गर्दीमुळे अनेकांना मतदानासाठी वेळ काढणे अवघड होऊ शकते. याच पार्श्वभूमीवर निवडणूक विभाग



आणि प्रशासनाने जनजागृती मोहिमेला गती देण्याची गरज व्यक्त केली आहे. आधी मतदान, मग लग्न असा संदेश देत मतदारांना मतदानासाठी प्रेरित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. निवडणूक विभागातील अधिकाऱ्यांचे मत आहे की मतदान हा लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव आहे. नागरिकांनी प्रथम मतदानाचे कर्तव्य बजावून नंतर विवाहसोहळ्यांना उपस्थित राहावे. यासाठी प्रशासन, सामाजिक संस्था, युवक मंडळे आणि विवाह आयोजक यांचा सहभागही महत्त्वाचा ठरणार आहे.

2 डिसेंबर रोजी लग्नाचा आनंद साजरा करताना मतदारांनी आपले नागरी कर्तव्य पार पाडणे अत्यावश्यक आहे. मतदान हा लोकशाहीचा सण आहे; त्यामुळे आधी मतदान, मगच लग्न ही भूमिका महत्वाची.

**निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अचलपूर**

**प्रशासनाचा संदेश**

मतदान हा लोकशाहीचा सण असून प्रत्येक नागरिकाने त्यात सक्रिय सहभाग नोंदवणे आवश्यक आहे. मतदान करण्यासोबतच इतरांनाही मतदानासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**लग्नसमारंभांमुळे मतदानात घट होण्याची भीती**

स्थानिक विवाह मंडळांच्या माहितीनुसार, 2 डिसेंबर हा अत्यंत शुभ दिवस असल्याने विवाहांची संख्या मोठी आहे. पाहुणे, वऱ्हाडी आणि समारंभाच्या तयारीमुळे अनेकांना मतदानाचा विसर पडू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

**विवाह आयोजकांची भूमिका महत्त्वाची**

विवाह आयोजकांनी पाहुण्यांना मतदान करूनच समारंभाला उपस्थित राहण्याचे आवाहन करणे गरजेचे असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**निवडणूक आयोग व सामाजिक संस्थांचे आवाहन**

अनेक स्वयंसेवी संस्था सोशल मीडियावर ‘पहिले मतदान, मग लग्न’ ही मोहीम राबवत आहेत. यामुळे नागरिकांपर्यंत योग्य संदेश पोहोचण्यास मदत होत आहे.

# कोकणचा सुपुत्र, भाजपाच्या विजयाचा शिल्पकार



**मुंबई कॉलिंग**

डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

बिहार विधानसभा निवडणुकीच्या आश्चर्यकारक निकालाने देशातील सर्वच विरोधी पक्षांना मोठा धक्का बसला आहे. २४३ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपा- जनता दल यु प्रणित एनडीएने २०० पेक्षा जास्त जागांवर विजय मिळवला तर राजद- काँग्रेसच्या महाआघाडीला केवळ ३५ जागांवर आपला गाशा गुंडाळावा लागला.

रणनितीकार प्रशांत किशोर यांच्या जनसुराज्य पक्षाला भोपळाही फोडता आला नाही. बिहारमधे भाजपाचे सर्वाधिक म्हणजे ८९ आमदार निवडून आले. देशातील सर्वात मागास आणि गरीब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व जातीपातीच्या समिकरणाने खोलवर पोखरून निघालेल्या राज्यात भाजपाचे सर्वाधिक आमदार निवडून आणण्याची किमया कोकणच्या सुपुत्राने म्हणजेच विनोद तावडे यांच्या चाणक्यनितीने करून दाखवली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विक्रमवीर मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या डबल इंजिन सरकारला बिहारच्या जनतेने प्रचंड जनादेश दिला असला तरी विजयाचे शिल्पकार पक्षाचे बिहारचे प्रभारी सरचिटणीस विनोद तावडे हे मानले जात आहेत. कोकणच्या सुपुत्रानेच आपल्या रणनितीतून बिहारमधे भाजपाला घवघवीत यश मिळवून दिले आहे.

६२ वर्षाचे विनोद तावडे हे संघ परिवाराच्या मुशीतून तयार झाले आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून त्यांनी सार्वजनिक जीवनाचा प्रवास सुरू केला. विधान परिषदेवर ते आमदार होते. सन २०१४ मधे मुंबईतील बोरीवली मतदारसंघातून विधानसभेवर आमदार झाले व देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमधे कॅबिनेट मंत्री झाले.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, वैद्यकीय शिक्षण मंत्री, सांस्कृतिक मंत्री म्हणून त्यांनी काम केले. मुंबई भाजपाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी योगदान दिले. प्रमोद महाजन व गोपीनाथ मुंडे यांच्या काळात संघर्ष करून विविध पातळीवर लढणारा कार्यकर्ता अशी त्यांची पक्षात प्रतिमा झाली.

सन २०१९ विधानसभा निवडणुकीत पक्षातील अनेक दिग्गजांना तिकीटे नाकारली गेली, त्यात विनोद तावडे यांचाही समावेश होता. कॅबिनेट मंत्री म्हणून काम केलेले तावडे हे निश्चित निवडून आले असते. शिवाय बोरीवली हा तर भाजपाचा भक्कम गड होता व आजही आहे. शेवटच्या क्षणाला आपले तिकीट कापले हा तावडे यांना मोठा धक्का होता. पण ते शांत राहिले.

देवेंद्र फडणवीसांनी विनोद तावडे, पंकजा मुंडे आदींची तिकीटे कापली अशी तेव्हा चर्चा होती. पण तावडे यांनी कोणाला दोष दिला नाही, कोणावर टीका केली नाही, उलट तेव्हा बोरीवली मतदारसंघातील पक्षाचे उमेदवार सुनील राणे यांचा त्यांनी प्रचार केला.

राज्याच्या राजकारणात आपल्याला फारसा वाव नाही हे त्यांच्या लक्षात आले व त्यांनी मुंबईहून थेट दिल्ली गाठली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची विद्यार्थी परिषदेत काम करताना असलेली मैत्री त्यांना उपयोगी पडली आणि सन २०२१ मधे नड्डा यांनी त्यांच्यावर पक्षाच्या दिल्लीतील मुख्यालयातील संघटनात्मक जबाबदारी सोपवली.

विनोद तावडे यांच्याकडे पक्षाने हरयाणाचे प्रभारी म्हणून जाबबादारी दिली होती, हरयाणामधे भाजपाची सत्ता आली व त्यांनी आपले मिशन पूर्ण करून दाखवले. जेव्हा त्यांच्याकडे बिहारचे प्रभारी म्हणून जबाबदारी पक्षाने सोपवली तेव्हा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांना, बिहार हे भाजपाच्या दृष्टीने महत्वाचे राज्य आहे. काहीही करून आपल्याला बिहार जिंकायचे आहे असे सांगितले. महाराष्टात तीन दशके पक्षाचे काम केलेल्या तावडे यांच्यावर बिहारची जबाबदारी हे मोठे आव्हान होते.

२०२० मधे बिहारमधे भाजपा- एनडीएच्या विरोधात वातावरण होते. तेव्हा भाजपाला बरोबर घेऊन नितीशकुमारच मुख्यमंत्री होते. तरीही २०२२ मधे नितीशकुमार यांनी भाजपाशी असलेली युती अचानक तोडली व राजद व काँग्रेसशी आघाडी करून सरकार स्थापन केले व ते पुन्हा मुख्यमंत्री झाले. त्या सरकारमधे तेजस्वी यादव उपमख्यमंत्री होते. राजदशी पुन्हा एकदा केलेला घरोबा नितीशकुमार यांना मानवला नाही आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या अगोदर पुन्हा त्यांना राजद- काँग्रेसला जय बिहार केला, एनडीएच्या छावणीत परतले व भाजपाला बरोबर घेऊन पुन्हा मुख्यमंत्री झाले.

नितीशकुमार यांच्या धरसोड वृत्तीमुळे पलटुराम किंवा पलटुकुमार अशी त्यांची प्रतिमा झाली होती. अशा अस्थिर वातावरणात विनोद तावडे यांच्याकडे पक्षाने बिहारची प्रभारी म्हणन जबाबदारी दिली गेली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या अगोदर नितीशकुमार हे इंडिया आघाडीचे प्रमुख नेते होते.

ते जरी अधिकृत निमंत्रक नव्हते तरी पंतप्रधानपदाचा चेहरा होऊ शकतात, अशी तेव्हा चर्चा होती, राहुल गांधींना पर्याय नितीशकुमार अशा बातम्या त्या काळात माध्यमातून झळकत होत्या. निवडणुकीला काही महिने उरले असताना ते एनडीएमधे परत आले व भाजपाबरोबर राज्यात सरकार स्थापन केले.

एनडीए मधे पाच पक्ष आहेत. भाजपा, जनता दल यू, लोकजनशक्ति (पासवान ) उपेंद्र कुशावह आणि जतीनराम मांझी अशा सर्वांना एकत्र संभाळणे, त्यांच्यात समन्वय राखणे, रूसवे फुगवे दूर करणे, हे काम तावडे यांनी मोठ्या कौशल्याने केले. तिकीट वाटप करतानाही उमेदवारांची निवड विचारपूर्वक केली.

गायिका मैथिली ठाकूर यांना मैदानात उतरविण्याचा निर्णय तावडे यांचाच. त्या भरघोस मतांनी निवडून आल्याच पण नव्या विधानसभेत सर्वात तरूण आमदार आहेत. विनोद तावडे यांनी केलेल्या कामगिरीने भाजपा हायकमांड खूश आहे. मोदी, शहा, नड्डा यांचा त्यांनी विश्वास संपादन केला आहे. जातीपातीच्या व्होट बँक राजकारणातून बिहारच्या मतदारांना बाहेर कसे काढता येईल याचा त्यांनी सखोल अभ्यास केला.

बिहारमधे सुरूवातीला जातीची समिकरणे एवढी नव्हती मात्र लालूप्रसाद यादव याच्या काळात ती खोलवर रूजली. याच राज्यातून जॉर्ज फर्नांडिस हे तर मुज्जफरपूरमधून तर मधु लिमये हे बांका व मुंगेरमधून लोकसभेवर निवडून आले होते. या नेत्यांना मतदान करताना जातीपातीचा विचार कुणाच्या मनाला शिवलाही नव्हता. त्यांच्या काळात लालू यादव व नितीशकुमार हे विद्यार्थी होते.

यादव- मुस्लिम ही राजदची भक्कम व्होट बँक होती, या बँकेला या निवडणुकीत तडा गेला. तावडे यांनी अगोदरपासून विविध जाती व समाजाच्या नेत्यांबरोबर व प्रमुख कार्यकर्त्यांबरोबर बैठका घेतल्या व त्यांच्याशी सुसंवाद राखला. यादव व मुस्लिमांच्या मतांचे विभाजन झाले. त्याचा लाभ भाजपा व जनता दल यु ला झाला. भाजपाने अनेक यादव नेत्यांना उमेदवारी दिली, त्यातून हा मतदार भाजपाकडे वळला.

प्रशांत किशोर यांच्या नेतृत्वाचा निवडणुकीत मोठा गाजावाजा झाला. बिहारमधील केजरीवाल असा मिडियात त्याचा उल्लेख होऊ लागला. त्यांच्या प्रचारसभाना व रोड शोला मोठी गर्दी लोटत असे.

त्यांनी मोदी-शहांवर कडवट टीका केली. पण त्यांच्या टीकेला उत्तर देऊन त्यांना मोठे करायचे नाही अशी रणनिती भाजपाने राबवली. त्यामुळे प्रशांत किशोर यांची प्रतिमा माध्यमांपुरतीच मर्यादीत राहीली.

रफ्तार पकड चुका है बिहार, ही भाजपाची घोषणा होती. हाच प्रचाराचा केंद्रबिंदू पक्षाने बनवला होता. प्रचाराची आखणी व नियोजन अचूक होते. त्यात तावडे यांचा मोठा वाटा होता. गेमचेंजर विनोद तावडे या कोकणच्या सुपुत्राला पक्षाच्या हायकमांडकडून बक्षिस काय मिळणार? राष्ट्रीय सरचिटणीसपदावरून बढती मिळणार की राज्यसभेवर खासदारकी की आणखी काही?

# गझलगायक सुरेश दंडे







देवेंद्र भुजबळ
९८६९४८४८००

ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे २०१७ साली झालेल्या चौथ्या स्वातंत्र्यवीर सावरकर विश्व साहित्य संमेलनाच्या निमित्ताने विदर्भातील प्रसिद्ध गझलगायक सुरेश दंडे यांची आणि माझी ओळख झाली आणि अल्पावधीतच त्यांच्या निरलस, निगर्वी स्वभावामुळे आमच्यात मैत्रीचे स्नेहबंध निर्माण झाले.

नागपूर येथील ख्यातनाम संगीतकार आणि गायक व्ही. एस. उपाख्य बाबूराव दंडे यांचे सुपुत्र सुरेश दंडे हे मराठी गझल गायकीच्या क्षेत्रातील एक अग्रगण्य नाव आहे. त्यांचे वडील बँकेत अधिकारी होते. वडिलांची नोकरी बदलीची असल्याने सुरेशचे शिक्षण महाराष्ट्रात अनेक ठिकाणी झाले.

संगीत हे सुरेशजींकडे वारसाहक्कानं आलं आहे. त्यांना वडिलांकडून संगीताचे संस्कार मिळाले. त्यांनी संगीताचे धडे वडिलांकडूनच घेतले. भारतीय जीवन विमा निगममधून विकास अधिकारी पदावरून सेवानिवृत्त झालेले सुरेश दंडे गेली ३० हून अधिक वर्षे आकाशवाणी, दूरदर्शनसह देश विदेशात मराठी-हिंदी गझलचा प्रसार-प्रचार करत आहेत.

त्यांनी देशभरात मराठी व हिंदी गजलांवर आधारित फजा-ए-गजल, स्टोरी ऑफ गजल, यादे मनशा, आईना-ए-गजल, दिलकश लम्हे, गजलो के रंग-गीतों के संग असे कार्यक्रम सादर केले आहेत.

महाराष्ट्रात मुंबई, नागपूर, नाशिक, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, रत्नागिरी येथे तर राज्याबाहेर दिल्ली, जयपूर, हैद्राबाद, रायपूर, बिलासपूर, सिवनी, बालाघाट, माऊंट अबू आदी ठिकाणी आतापर्यंत ५०० हून अधिक सांगितिक मैफलींचं त्यांनी सादरीकरण केलं आहे. या शिवाय त्यांनी आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या विविध वाहिन्यांवर गायनाचे कार्यक्रम सादर केलेत.

गोल्डन मेमरीज या जुन्या-नव्या हिंदी चित्रपटातील गीत आधारित कार्यक्रमाचे देशभरात १०० च्यावर प्रयोग केले आहेत. त्यांनी मुंबईतील स्टडी सेंटर ऑफ फॉरेन लँग्वेजेस च्या वतीने दीनानाथ मंगेशकर सभागृहात जपानचे डॉ. साकाकीसान यांच्या उपस्थितीत महफिल-ए- गजल कार्यक्रम सादर केला आहे. कवीवर्य सुरेश भट यांच्या स्मृतीप्रित्यर्थ २००९ मध्ये अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे रंग माझा वेगळा कार्यक्रमाचे आयोजन केले असून याच प्रामुख्याने सारेगमप फेम शशांक दंडे, सायली पानसे, आणि यज्ञेश्वर लिंबेकर यांनी सुरेश दंडे यांनी स्वरबद्ध केलेल्या सुरेश भटांच्या गीत-गजलांचं सादरीकरण केलं.

सुरेश भट यांच्या गझलांच्या प्रसारासाठी त्यांनी नागपूर येथे स्वरविहार ही संस्था स्थापन केली असून त्या संस्थेद्वारे ते नवोदित गायकांना मार्गदर्शन करतात. तसेच या संस्थेमार्फत देशभरात सांगितक मैफलींचं आयोजन करीत असतात. कामठी कॅन्टॉनमेंट तसेच नागपूरचे चिटणीस सेंटर येथेही त्यांनी अनेक गजल मैफली सादर केल्या आहेत. विविध गायन स्पर्धेत परीक्षकाची भूमिका देखील त्यांनी बजावली आहे.

संत मोरारीबापू यांचे आशीर्वाद सुरेश दंडे यांना लाभले असून त्यांच्या उपस्थितीत गीत-गजलांचे सादरीकरण करून त्यांनी मोरारीबापू यांचे मन जिंकले. यावेळी बापूंच्या हस्ते शाल व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

हैद्राबाद चाप्टर तर्फे रॅडिसन प्लाझा व ज्युबिली हिल्स हॉटेलमध्ये आयोजित इंडो ब्रिटीश स्कॉलर्स मीटमध्ये (जीएसटी कमिशनर डॉ.फईम अहमद यांच्या उपस्थितीत) गजल मैफिल सादर केली होती. सांगितक मैफलींच्या निमित्तानं देशातच नव्हे, तर देशाच्या बाहेरही सुरेश दंडे यांनी आपल्या गायनाची मोहोर उमटविली आहे.

२०१८ साली अमिटी युनिव्हर्सिटीचे कुलगुरू धनंजय केसकर यांच्या उपस्थितीत गीत-गजलांची मैफल सादर केली. फ्रान्स, स्वित्झर्लंड आदी देशात गझलचे सादरीकरण केले आहे. याशिवाय सिडनी, ऑस्ट्रेलिया येथे २०१७ साली झालेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर विश्व संमेलनात गझलगायक म्हणून त्यांना निमंत्रित करण्यात आलं होतं.

सुरेश यांनी अनेक शायरांच्या गजला स्वरबद्ध केल्या असून त्या विविध मंचांवरून सादर केल्या आहेत. यात गझलकार माधव बोबडे यांच्या गझलांवर आधारित नक्षत्रे माळताना तसेच शिरीष नाईक यांच्या जिंदा जरूर हूँ असे कार्यक्रम त्यांनी नागपूरात सादर केले आहेत.

आपल्या सुरेल गायकीने त्यांनी कार्यक्रमाला उपस्थित नागपूरचे पोलिस उपायुक्त चिन्मय पंडित आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश डॉ. सुवर्णा केवले, प्रसार भारतीचे डॉ. पाराशर आदी मान्यवरांची मने जिंकली.

२०१९ साली पु. ल. देशपांडे, सुधीर फडके तसेच ग. दि. माडगुळकर या त्रयीच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्तानं चंद्रपूर आणि मुलचेरा येथे गझलगायन कार्यशाळेतून त्यांनी विद्यार्थ्यांना गायकीचे धडे दिले आहेत. कॅसेटस् आणि सीडीजच्या माध्यमातून त्यांची गायकी घराघरात पोहोचली असून २०१३ साली प्रसारित सुरेश भटांच्या गझलांवर आधारित रंग माझा वेगळा हा त्यांचा संग्रह बहुश्रूत आणि रसिकप्रिय ठरला. तत्कालीन केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री सतीश चतुर्वेदी यांच्याहस्ते मंत्रालयात मान्यवरांच्या हस्ते या संग्रहाचं विमोचन झालं होतं, हे विशेष.

प्रख्यात गायक सुरेश वाडकर, अनुराधा पौडवाल, प्राजक्ता शुक्रे यांच्यासह तेव्हा नसेन मी या मराठी गाण्यांच्या अल्बममध्ये सुरेश यांनी गायन केलं असून फाऊंटन या नामांकित म्युझिक कंपनीने काढलेल्या संग्रहाचे विमोचन मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांच्या हस्ते मुंबईत झाले आहे. अनेक सांगितिक कार्यक्रमातून त्यांनी आपला सहभाग नोंदविला आहे. श्री. श्री. रविशंकर यांच्याद्वारे प्रस्तुत अंतर्नाद आणि लयतरंग कार्यक्रमात त्यांचा सहभाग राहिला आहे. हिंदी, उर्दू गजलचे अभ्यासक डॉ. विनय वाईकर यांच्या आईना-ए-गजल या गझल कोषातही त्यांचा सहभाग आहे.

आंध्रप्रदेश सरकारच्या सांस्कृतिक खात्याच्या वतीने हैद्राबाद इथं झालेल्या दिलकश लम्हे या बहुभाषिक गजल महोत्सवात देखील त्यांना निमंत्रित करण्यात आले होते. सीटी न्यूज, अमरावती वाहिनीच्या सुरों की जंग, या सांगितिक रियलिटी शोचे ते समन्वयक तथा परीक्षक देखील होते.

सुरेश यांच्या सांगितिक कार्याची दखल घेत अनेक संस्था, संघटनांनी त्यांना सन्मानित केले आहे. गोल्डन मेमरीज, जुन्या अवीट हिंदी चित्रपट गीतांवर आधारित कार्यक्रम, मराठी गजलांवर आधारित रंग माझा वेगळा तसेच नॉस्टॅल्जिक असे स्वतःचे विविधरंगी कार्यक्रम ते सादर करत असतात.

त्यांच्या या कार्यक्रमांबद्दल महाराष्ट्र राज्याचे माजी पोलिस महानिरीक्षक तसेच संगीताचे दर्दी असलेले अरविंद इनामदार, शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे, गझल गायक हरीहरन, भजनसम्राट अनुप जलोटा, संगीतकार रवी दाते आदी मान्यवरांनी प्रशंसोद्गार काढले आहेत.

सुरेशची भव्यदिव कारकीर्द असून देश विदेशात कार्यक्रमाकरिता त्यांना निमंत्रित करण्यात येत असते. त्यांच्या सांगितिक कार्याची दखल घेत अनेक संस्था, संघटनांनी त्यांना सन्मानित केले आहे. मध्य भारत स्तरावरील नवरत्न प्रतिभा हा पुरस्कार तसेच प्रख्यात गायक वसंतराव देशपांडे यांच्या जन्मगावी सावळापूर येथे पं. वसंतराव देशपांडे स्मृती पुरस्काराने सुरेश दंडे यांच्या सन्मानात भर घातली आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित द्वैभाषिक गझल संमेलनात तत्कालीन मंत्री फौजिया खान यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. हैद्राबाद येथील रवींद्र भारती सभागृहात आयोजित राष्ट्रीय गजल महोत्सवात ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त पद्मविभूषण डॉ. सी. नारायण रेड्डी यांच्या हस्ते देखील त्यांचा सन्मान झालेला आहे. २०१३ साली पाँडेचरी येथे झालेल्या हिडन पोर्टेन्शियल कार्यक्रमात श्री संत ज्ञानेश्वरांचं पसायदान सादर केल्याबद्दल अमेरिकेतील वर्ल्ड म्युझिक थेरपी संघटनेच्या अध्यक्षा प्रो. डॉ. ॲनी हेडलचिट यांच्याहस्ते देखील त्यांचा सन्मान झालेला आहे. केवळ स्वतःचीच गायन प्रतिभा न जोपासता समाजात संगीत विषयक प्रेम वाढीस लागावं यासाठी सतत प्रयत्न करत असलेल्या सुरेश दंडे यांच्या आगामी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

# निवडणुक रणनितीकार पीके यांना पराभव कां स्विकारावा लागला?



मिलिंद गड्डमवार
(मुक्त पत्रकार)
राजुरा जि. चंद्रपूर.
9511215200

या देशात निवडणुका आणि पैशाचे समीकरण रूजविण्यात कॉंग्रेस पार्टी अग्रेसर राहिलेली आहे. त्या काळात बीजेपीला फक्त दोन सिटांवर समाधान मानावे लागत होते. बीजेपीने कॉंग्रेसचे धोरण स्विकारले. यासाठी व्यापारी, उद्योगपतींना हाताशी धरले.

कारणं भारतीय मतदारांना देशाच्या प्रगतीशी, स्वतःच्या उज्वल भवितव्याशी, भ्रष्टाचाराशी काहीही देणेघेणे उरलेले नाही. त्यांना कुठलिही चिंता सतावत नाही. दोन वेळेचे जेवण, दारू, मौजमस्ती करायला मिळाली की त्यांच्या जीवनाचे सार्थक झाले असे त्यांना वाटते आहे. भारतीय मतदार हा अल्पसंतुष्ट आहे. त्याला शिक्षणाशी, रोजगाराशी, आरोग्य सेवेशी, भ्रष्टाचाराशी काहीही देणेघेणे नाही. हे गुपीत सर्वच राजकीय पक्षांनी हेरलेले आहे.

खरे तर निवडणुक रणनितीकार प्रशांत किशोर यांनी स्वतः कॉंग्रेस व भाजपाला निवडून आणण्यासाठीची रणनिती आखून दिलेली होती. यात ते सफल पणं झालेले आहेत. याच करीता कदाचित त्यांनी आपल्या रणनितीवर भरवसा ठेऊन स्वतःच्या 'जन सुराज पार्टी' ची बिहार मध्ये स्थापना केली असावी.

या आधी ते जनता दल युनायटेडचे उपाध्यक्ष होते. त्यांना राजकारणातील अनुभव होता. याचा फायदा घेण्यासाठीच त्यांनी निवडणुक लढवून पाहिली असावी. हे निर्विवादपणे मान्य करावे लागेल.

बिहारच्या राजकारणात आधीपासूनच साम, दाम, दंड आणि भेद याला अती महत्व प्राप्त झालेले आहे. बिहार म्हणजे 'गुंडाराज' हे समिकरण रूढ झालेले आहे. याला काही प्रमाणात छेद देण्याचे काम भाजपाने केलेले आहे. भाजप ही पार्टी निरंतर राजकारणाचा विचार करणारी पार्टी आहे.ती निवडणुकीपुरता राजकारणाचा विचार करीत नाही. भाजप आपल्या पराभवावर सतत चिंतन आणि मनन करीत असते.यात सुधारणा घडवून आणीत असते. कुठल्याही निवडणुकी पुर्वी त्यांची रणनिती ही ठरवली जाते. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते. मग ते निवडणुक पुर्व महिलांच्या खात्यात दहा हजार रुपए जमा करणे असो वा लाडकी बहिण योजना असो. ते कायदा बाजूला सारून, कुठल्याही विरोधाला न जुमानता आपले काम ठामपणे करीत असतात.

त्याचा निवडणुकीत प्रचार करून आपली लाट निर्माण करतात आणि याचा फायदा उचलतात. भाजपणे आता महिलांवर विश्वास टाकणे सुरू केलेले आहे.कारणं महिला ही कुटूंबातील प्रमुख घटक असते.

तिची विश्वासार्हता ही पुरूषांपेक्षा अधिक असलेली पहायला मिळते आहे. हे अनेक निवडणुकांमधून सिध्द झालेले आहे. याचा विचार इतर पक्षांना करावा लागेल.

याशिवाय महिला या पुरूषांपेक्षा जास्त धोरणी असतात. त्यांना बचतीची सवय जडलेली असते. महिला या दारू, गुटखा, खर्रा किंवा इतर व्यसनाच्या आहारी गेलेल्या नसतात. अपवाद असू शकतो. परंतु याचे प्रमाण महिला वर्गात अत्यंत कमी पहायला मिळते आहे. ते चांगल्या कामासाठीच पैसा खर्च करतात. पुरूष वर्गानी त्यांच्या पैशावर डल्ला नाही मारला तर !

जन सुराज पक्षाला बिहारच्या निवडणुकीत एकही जागा जिंकता आलेली नाही.तरीही त्यांनी मत चोरी झाल्याचा, ईव्हीएमचा घोटाळा असल्याचा संशय व्यक्त केलेला नाही किंवा कुठलाही आरोप हा लावलेला नाही. निवडणुकीतील संपुर्ण पराभवाची जवाबदारी ही प्रशांत किशोर यांनी स्वतःवर घेतलेली आहे. ही बाब खास करून कॉंग्रेस पक्षाला लक्षात घ्यावी लागेल.

कॉंग्रेस पक्षाला किंवा देशातील इतर विरोधी पक्षांना आज पर्यंत विरोधी पक्षाची भुमिका ही प्रभावीपणे निभावता आलेली नाही. हे सत्य स्विकारावेच लागेल. जनते समोर, देशातील तरूणाई समोर अनेक गंभीर प्रश्न आवासून उभे असतांना ते आव्हान कुठल्याही विरोधी पक्षाला पेलता आलेले नाही.हे या निकालावरून सिध्द झालेले आहे.

विरोधकांना आज पर्यंत सत्ताधारी पक्षासमोर कुठलेही गंभीर आव्हान हे उभे करता आलेले नाही. ही अत्यंत दुर्दैवी बाब ठरते आहे. आज संपुर्ण देशात शेती, शिक्षण, आरोग्य, महागाई आणि रोजगाराची अवस्था काय आहे? यावरून कुठे आंदोलन झाल्याचे आठवत नाही. निव्वळ महिलांना समोर ठेवून लुभावण्या योजनांची भरमार केली जात आहे.

या देशातील पुरूष मतदार कां झोपी गेला आहे? तो व्यसनाधीन कां झाला आहे? त्याने झोपेचे सोंग कां घेतले आहे? या देशातील तरूणाई काय करते आहे? ती सत्ताधाऱ्यांची गुलाम, बटीक बनली आहे कां? असे अनेक प्रश्न उभे झालेले आहे.

बिहार मध्ये जन सुराज पक्षाला आलेले अपयश हा निवडणुक पुर्व पैसे वाटपाचा, साम, दाम, दंड आणि भेद नितीचा निवडणुकीवर असलेला प्रभाव दाखवून देतो आहे. हेच चित्र जवळपास संपुर्ण देशात बघायला मिळते आहे. याला छेद देण्याचे काम देशातील सुज्ञ मतदारांचे खास करून तरूणाईचे आहे.

देशात चांगल्या प्रशासनाची निर्मिती करण्यासाठी देशातील तरूणाईला सुनियोजीत पध्दतीने चळवळ उभी करावी लागेल. ती निवडणुकीच्या तोंडावर नसेल. यासाठी देशातील भ्रष्टाचारावर प्रहार करावा लागेल. रोजगार निर्मितीवर, शिक्षणावर, आरोग्य सुविधांवर जोर द्यावा लागेल. कमिशनखोरीवर अंकुश ठेवावा लागेल. हे काम वाटते तेवढे सोपे काम नाही. यासाठी व्यवस्था परिवर्तनावर जोर द्यावा लागेल.

कॉंग्रेस पक्ष हे काम करू शकणार नाही. यासाठी जन सुराज सारख्या पक्षांची एकजूट करून लोकनेते जयप्रकाश नारायण यांच्या पावलावर पाऊल ठेऊन चालावे लागेल. याशिवाय दुसरा मार्ग दृष्टिपथात दिसून येत नाही.

**वाचक लिहितात**

## स्त्रिया, मुलांच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे बनवावेत!

काल नाशिक जिल्ह्यात मालेगावमध्ये केवळ साडेतीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून तिला डोक्यात दगड घालून ठार मारण्यात आले. एका २४ वर्षीय खैरनार नावाच्या इसमाने हे भयंकर कृत्य केले. या घटनेने सर्व महाराष्ट्रच पुन्हा हादरला आहे!

हे सर्व अतिशय संतापजनक आहे. सर्व भारतातील स्त्रीवर्ग, मुली, लहान मुले यांच्यावर जर अत्याचार थांबवायचे असतील तर अशा नराधमांना भर चौकात सरकारने कठोर शिक्षा दिली पाहिजे. अतिशय कठोर शिक्षा देऊन कठोर कायदे बनवून ते तात्काळ अमलात आणले पाहिजेत.

तसेच संकेतस्थळे, सोशल मीडिया, वेब सिरीज आणि चित्रपट यातून दाखविली जाणारी सर्व अश्लीलता, भडक दृश्ये, अर्धनग्न कपडे, संपूर्णपणे बंद केले पाहिजेत. तर आणि तरच अशा घाणेरड्या घटना पुन्हा होणार नाहीत आणि लहान मुले, स्त्रिया यांना सुरक्षित वाटेल. हीच सर्वसामान्य प्रत्येक व्यक्तीची इच्छा आहे!

■ सौ. आदिती देखणे, नवीन पनवेल.

## मल्हारी मार्तंड नवरात्र

मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपासून ते मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीपर्यंत मल्हारी मार्तंड नवरात्र साजरे केले जाते. या नवरात्राला खंडोबाचे नवरात्र असे देखील म्हटले जाते. या काळात भगवान शंकराचा अवतार असलेल्या मल्हारी मार्तंड भैरवनाथाची (खंडोबा) विशेष आराधना केली जाते आणि चंपाषष्ठीच्या दिवशी मुख्य उत्सव साजरा केला जातो.

प्रतिपदा ते षष्ठीपर्यंत सहा दिवस घट बसवतात. देव्हाऱ्यातील टाकास अभिषेक करून नंदादीप अखंड तेवत ठेवला जातो. कुटुंबप्रमुख या सहा दिवसांत उपवास करतात आणि मल्हारी सप्तशतीची ५ किंवा २२ पारायणे करतात. या काळात ब्राह्मण, सुवासिनी तसेच वाघ्या आणि मुरळी यांना भोजन देण्याची प्रथा आहे. चंपाषष्ठीला कुळाचार करून या नवरात्राची सांगता केली जाते.

महाराष्ट्रातील जेजुरी, मळवड, निंबलगाव, खंडोबा टेकडी यांसह अनेक ठिकाणी हे नवरात्र अत्यंत भक्तिभावाने साजरे केले जाते. भंडारा, गोलाई नृत्य, भजने आणि वाघ्याझमुरळी यांचे वादन यामुळे मंदिर परिसर दैवी वातावरणाने भारलेला असतो. तसेच यातून लोकपरंपरेची झलक बघायला मिळते. मल्हारी मार्तंड नवरात्र हे श्रद्धा, परंपरा आणि लोकसंस्कृती यांचे अतिशय सुंदर असे मिश्रण आहे.

■ सौ. वर्षा आवदे, नागपूर.

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## निवडणुकीच्या काळात

निवडणूकीच्या काळात
हुजऱ्यांनाही भाव येतो
कधी नव्हे ती किंमत
उमेदवाराकडून घेऊन जातो..

एका ताटात जेवणारे
एकमेकांचे शत्रु बनले
जन्मजात वैर असणारे
एकमेकाचे मित्र बनले ..!

# हिवाळ्यात महिनाभर दररोज प्या गाजर आणि बीटचा रस



हिवाळा ऋतू सुरू झाल्याने आपल्या प्रत्येकांच्या आहारातील खाण्याच्या सवयी बदलू लागतात. या ऋतूत शरीराला अधिक पोषणाची आवश्यकता असते. या हंगामात कमकुवत प्रतिकारशक्तीमुळे आळस, थकवा आणि संसर्गाचा धोका निर्माण होऊ शकतो. हिवाळ्यात प्रत्येकजण त्यांच्या आहारात हंगामी भाज्यांचा समावेश करतात. ज्यामध्ये गाजर, बीट, पुदिना, कोथिंबीर, पालक आणि आवळा सारखे भाज्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात.

हिवाळा आला आहे आणि बरेच लोकं त्यांच्या आहारात गाजर आणि बीटाचा समावेश करतात. तज्ञांच्या दृष्टिकोनातून महिनाभर गाजर आणि बीटचा रस प्यायल्यास आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरते.

गाजर आणि बीटाचा रस हिवाळ्यात तंदूरस्त राहण्याचे टॉनिक मानले जाते. गाजर आणि बीट हे हिवाळ्यातील भाज्या आहेत, ज्यामध्ये व्हिटॅमिन ए, लोह, फोलेट, अँटीऑक्सिडंट्स आणि खनिजे भरपूर असतात. रक्ताची संख्या वाढवण्यापासून ते त्वचा उजळ करण्यापर्यंत, ते एक सुपर ड्रिंक म्हणून काम करतात.

गाजराच्या सेवनाने शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढते. कारण त्यात कॅरोटीन असते, जे शरीरात व्हिटॅमिन ए मध्ये रूपांतरित होते. तसेच गाजराचे रस प्यायल्याने आपल्या डोळ्यांसाठी, त्वचेसाठी, केसांसाठी आणि यकृतासाठी ते फायदेशीर ठरते. तर बीटमध्ये जीवनसत्त्वे अ, क, फोलेट, लोह, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि असंख्य अँटीऑक्सिडंट्स असतात, जे शरीरातील रक्त वाढविण्यास आणि रक्त परिसंचरण सुधारण्यास मदत करतात. गाजर आणि बीटचा रस प्यायल्याने अनेक फायदे होतात.

**हिमोग्लोबिन सुधारते**

गाजर आणि बीट हे दोन्ही लोह, फोलेट आणि अँटिऑक्सिडंट्सचे उत्कृष्ट स्त्रोत आहेत असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. दररोज एक ग्लास गाजर आणि बीटचा रस मिक्स करून प्यायल्याने नैसर्गिकरित्या शरीरात हिमोग्लोबिन वाढू शकते आणि अशक्तपणाची समस्या देखील दूर होते.

**त्वचेचा रंग सुधारतो**

गाजर आणि बीटमध्ये बीटा-कॅरोटीन, जीवनसत्त्वे अ आणि क असतात, जे त्वचेला आतून पोषण देतात. यामुळे रंग सुधारतो, मुरुमे कमी होतात आणि चेहऱ्याला नैसर्गिक चमक मिळते.

**एनर्जी आणि स्टॅमिना वाढवते**

गाजर आणि बीटमध्ये नायट्रेट्स असतात, जे रक्तप्रवाह सुधारतात. यामुळे स्नायूंना ऑक्सिजनचा पुरवठा वाढतो. एक महिना दररोज एक ग्लास गाजर आणि बीटचा रस प्यायल्याने परिणाम दिसू लागतील.

**डोळ्यांसाठी फायदेशीर**

गाजरांमधील बीटा-कॅरोटीन व्हिटॅमिन ए मध्ये रूपांतरित होऊन डोळ्यांना बळकटी देते. डोळ्यांची कोरडेपणा, सौम्य जळजळ आणि कमकुवतपणा एका महिन्यात बरा होऊ शकते.

याव्यतिरिक्त, महिनाभर गाजर आणि बीटचा रस प्यायल्याने यकृत स्वच्छ होते, पचनशक्ती मजबूत होते आणि बद्धकोष्ठता टाळता येते. यामुळे हृदयाचे आरोग्य सुधारते आणि कोलेस्टेरॉल आणि रक्तदाब संतुलित होण्यास मदत होते.

# ग्राम सचिव मुख्यालयातून गायब

## गटविकास अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष ◆ ग्रामपंचायतींचे कामकाज विस्कळीत

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार,( दि. 19 )** – तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसेवक मुख्यालयात हजर राहत नसल्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. ग्रामसेवकांच्या सततच्या गैरहजेरीमुळे पंचायतींचे दैनंदिन कामकाज पूर्णपणे विस्कळीत झाले असून ग्रामस्थांना शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे. विशेष म्हणजे, या सर्व परिस्थितीकडे गटविकास अधिकारी आणि पंचायत समिती प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.




ग्रामसेवक हे ग्रामपंचायतीचे मुख्य प्रशासकीय अधिकारी असल्याने जलजीवन मिशन, स्वच्छ भारत अभियान, मनरेगा, घरकुल, कर व महसूल वसुली यांसह अनेक महत्त्वाची कामे त्यांच्या मार्फतच पार पडतात. मात्र अनेक ठिकाणी ग्रामसेवक आठवड्यातून एकदा येऊन पुन्हा गायब होतात, तर काही ठिकाणी तालुक्यात काम आहे असे सांगत आपली जबाबदारी टाळतात. मोठ्या ग्रामपंचायतींमध्येही हीच परिस्थिती असून सचिव नसल्याने पंचायत बैठका होत नाहीत, अर्ज व प्रमाणपत्रांची पूर्तता अडकली आहे आणि निधी–वितरणात अडथळे निर्माण झाले आहेत. सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी या परिस्थितीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ग्रामसेवक नसल्याने साध्या कागदपत्रांसाठीही गावकऱ्यांना तालुक्याला जावे लागते. वेळ, पैसा आणि श्रम वाया जात आहेत, असे अनेकांनी सांगितले.

### जाणीवपुर्वक दुर्लक्ष

ग्रामस्थांनी अनेक वेळा गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या असतानाही कोणतीही कारवाई होत नसल्याचा आरोप स्थानिक लोकप्रतिनिधींनी केला आहे. काही ग्रामसेवकांच्या गैरहजेरीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचाही संशय व्यक्त करण्यात आला आहे. शासनाने ग्रामसेवकांना मुख्यालयात उपस्थित राहण्याचे आदेश आणि हजेरी नोंद अनिवार्य केलेली असली, तरी प्रत्यक्षात हे नियम केवळ कागदोपत्री राहिले आहेत. प्रशासनाने तातडीने पावले उचलली नाहीत तर ग्रामपंचायतींचे संपूर्ण कामकाज ठप्प होण्याची शक्यता आहे.

### चौकशी होणे गरजेचे

गावकऱ्यांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार अधिकारी व ग्रामसेवकांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. अन्यथा ग्रामपंचायती पातळीवर व्यापक आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. ग्रामीण प्रशासनातील निष्काळजीपणाचे हे ज्वलंत उदाहरण तातडीने दूर करण्याची आवश्यकता अधोरेखित होत आहे.

# पटसंख्येनुसारच शिक्षक भरतीला न्यायालयाची मान्यता

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.19 )** – राज्य सरकारने 15 मार्च 2024 रोजी जारी केलेल्या संचमान्यतेच्या निर्णयाला उच्च न्यायालयाची हिरवा कंदील मिळाला आहे. शासनाला शिक्षकसंख्या निश्चित करण्याचा आणि समायोजनाविषयी निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे विद्यार्थी पटसंख्येनुसारच शिक्षकांची भरती होणार आहे.

मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती मंजूषा देशपांडे यांच्या खंडपीठाने दिलेल्या निकालात, विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार शिक्षकांची पदे ठरवणे हा धोरणात्मक प्रशासकीय निर्णय असल्याने त्यात हस्तक्षेप करण्याचे कारण नाही, असे नमूद केले. आरटीई कायदा हा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या हक्कासाठी असून शिक्षकांना एखाद्या विशिष्ट शाळेत कायम ठेवण्यासाठी नाही, असा निर्वाळा न्यायालयाने दिला. त्यामुळे शासन निर्णय ना मनमानी आहे, ना बेकायदा.



शासन निर्णयामुळे अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांना सेवेतून कमी करण्यात येणार नसून त्यांचे समायोजन जवळच्या शाळेत केले जाईल, अशी हमी सरकारने न्यायालयाला दिली असून ती नोंदवण्यात आली. तसेच, पती–पत्नीला 30 किलोमीटरच्या परिघात ठेवण्याची 18 जून 2024 च्या निर्णयातील तरतूद न्यायालयाने योग्य ठरवली. न्यायालयाने स्पष्ट केले की विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्यास शिक्षक पदे कमी करणे हा आरटीई नियमांशी सुसंगत निर्णय आहे. खासगी शाळांनाही हेच नियम लागू राहतील. पटसंख्या दहा पेक्षा कमी असल्यास तात्पुरता कंत्राटी शिक्षक नेमण्याचा शासन निर्णयही न्यायालयाने वैध ठरवला आणि अशा शिक्षकांनी नियमित सेवेसाठी दावा करू शकत नाही, असेही नमूद केले. तथापि, अतिरिक्त शिक्षकांची जबरदस्ती बदली करू नये, असा आदेश न्यायालयाने दिला. प्रत्येक शाळेत गरजेनुसार आवश्यक शिक्षकसंख्या कायम राहावी, यासाठी पूर्वीच्या काही बदली आदेशांना न्यायालयाने रद्द केले. संचमान्यतेविरोधात अनेक शिक्षक संघटनांनी याचिका दाखल करून निर्णय अन्यायकारक असल्याचा आरोप केला होता. विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकावर आधारित पटसंख्येमुळे पदवीधर शिक्षकांपैकी जवळपास 50 टक्के पदे अतिरिक्त ठरणार असल्याची भूमिकाही मांडण्यात आली होती. मात्र न्यायालयाने शासनाच्या निर्णयाला कायदेशीर मान्यता देऊन या सर्व याचिका नामंजूर केल्या.

## भातकुली पंचायत परिसरातून दुचाकी लंपास

**अमरावती** – फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन परिसरातील भातकुली पंचायत परिसरात पार्क केलेली दुचाकी क्रमांक एमएच 27/एम 5946 अज्ञात व्यक्तींनी चोरून नेली. श्याम रामदास निस्ताने (50, बोडणा, अमरावती) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढिल तपास फ्रेजरपूरा पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलिस कर्मचारी करीत आहे.

## हॉस्पिटलमधून बाईक चोरी

अमरावती – गाडगेनगर पोलिस स्टेशन हद्दीतील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या पार्किंगमधून अज्ञात व्यक्तीने शनिवारी तरुणाची बाईक चोरून नेली. अमरसिंग श्रवण राठोड (वय 40, रा. परसोडा) हे पत्नीला भेटण्यासाठी आले असताना ही घटना घडली.

# डोंगराळे येथील 3 वर्षीय बालिकेच्या निर्घृण हत्येचा निषेध



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.19 )** – मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात 16–17 नोव्हेंबर 2025 रोजी घडलेल्या तीन वर्षीय प्रज्ञा जगदीश दुसाने हत्याकांडाने संपूर्ण समाजात संतापाची लाट उसळली आहे. आरोपी विजय खैरनारने या निरागस मुलीवर अत्याचार करून दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याची माहिती समोर आली असून, हा प्रकार प्रज्ञाच्या वडिलांसोबत झालेल्या वैमनस्यातून झाल्याचा प्राथमिक संशय आहे.

या अमानवी, अंगावर काटा आणणाऱ्या घटनेचा आशापुरी सोनार महिला मंडळ आणि श्री संत नरहरी सेवा समिती, अमरावती यांच्या वतीने तीव्र निषेध नोंदवण्यात आला. आरोपीवर क्ल्हष्टस्ह कायद्यान्वये कठोर कारवाई करून त्याला तातडीने फाशीची शिक्षा देण्यात यावी. अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी गाव व जिल्ह्यात विशेष पोलिस तपास, सुरक्षा उपाय आणि जनजागृती मोहीम राबवावी. ही घटना मानवतेलाही लज्जास्पद आहे.

एका निरागस जीवाची बदला म्हणून हत्या करणे म्हणजे राक्षसी कृत्य आहे. आरोपीला कडक शिक्षा मिळालीच पाहिजे. अशी मागणी यावेळी करण्यात आली. निवेदन सादर करताना विशाखा प्रविण हरमकर, माधुरी अशोकराव अनासाने, अपर्णा शुभम मरोडकर, नयना आनंद पारेख, किरण सचिन चांदवडकर, स्नेहल आशिष करूले, संगीता दीपक पंचवटे, पुनम अतुल हरमकर, प्रतिभा गावंडे, पद्मा नासाने, तसेच समाजबंधू—सोमेश्वर गौड, विकास पंचवटे, सुनील पंचवटे, श्यामजी करुले, आकाश गौड, विजय खडेकार, प्रवीण हरमकर, सौरभ खडेकर आणि इतर अनेकजण उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी एकमुखाने या प्रकरणात तात्काळ न्यायाची मागणी केली असून प्रशासनानेही घटनेला आवश्यक गांभीर्याने हाताळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# प्रज्वल मानेकर यांचा वाढदिवस सेवाभावाने साजरा

## रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि. 19 ) :** प्रज्वल मानेकर यांनी यावर्षी आपला वाढदिवस सामाजिक सेवेसाठी समर्पित करत लोकहिताचा उपक्रम राबवला. गेल्या आठ वर्षांपासून वाढदिवस साजरा करण्याची त्यांची सेवा परंपरा सुरू असून प्रत्येक वर्षी एखाद्या वेगळ्या समाजहितकारी कार्यातून ते गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचवत आहेत.




गेल्या वर्षी बेघर आणि बेवारस व्यक्तींना ब्लँकेट व अन्नदान करून मदत करण्यात आली होती. यंदा मात्र परिसरात निर्माण झालेल्या रक्तटंचाईच्या परिस्थितीची जाणीव ठेवून प्रज्वल मानेकर यांनी वाढदिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन केले. नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले. शिबिराचे आयोजन शिस्तबद्ध व सुरक्षित पद्धतीने करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती आणि स्वयंसेवकांच्या सहभागामुळे उपक्रम सुरळीत पार पडला. समाजासाठी केलेले काम हीच खरी वाढदिवसाची भेट असे सांगत प्रज्वल मानेकर यांनी सर्व रक्तदाते, सहयोगी आणि स्वयंसेवकांचे आभार मानले. या कार्यक्रमाला आशीर्वाद देण्यासाठी गोपाल नांदूरकर उपस्थित होते आणि तरुण कार्यकर्त्यांमध्ये, ॲड. पवन वाडीवे, संदीप वासनिक, शुभम बारमासे, संदीप वैद्य, रुपेश जाधव, रोशन चरपे, चेतन अलोणे, अमोल पाटील, भूषण फरकाडे, सौरभ फरकाडे, राजेश ठेपे, शुभम वाडबूदे, प्रवीण वाडबुदे, अक्षय बारमासे, मनीष घोळसे, उज्वल मानेकर, यश उडाखे, मयूर नळकांडे, गौरव जवाहर, चेतन शेंम्बेकर, सुरज शेंम्बेकर, यश वाडबुदे, संदीप निकाजू, रितेश वहेकर, प्रदीप सातपुते, वेदांत वाडेकर, भावेश कडू, हर्षल भडांगे, चेतन चरपे, पियुष बनाईत, देवेश बारस्कर, निखिल पेंढारकर, सुजल सातपुते, किरण सातपुते, दर्शन शेंबेकर, आर्यन बारमासे या सर्वांचे विशेष योगदान राहिले.

# अंशिता सराफचे बुद्धिबळ स्पर्धेत उत्तुंग यश

## अंडर-9 गटात पटकाविला तृतीय क्रमांक

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी,( दि.19 )**– स्कूल ऑफ स्कॉलर्स, पारस आणि पावर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने पारस येथे आयोजित 9 वी एकदिवसीय ओपन रॅपिड चेस स्पर्धा रविवार, 16 नोव्हेंबर 2025 रोजी उत्साहात पार पडली. स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांतील एकूण 136 स्पर्धक सहभागी झाले होते, त्यापैकी 56 रेटेड प्लेयर्स स्पर्धेचे विशेष आकर्षण ठरले. या स्पर्धेत अंशिता नितीन सराफ हिने अंडर 9 (मुली) गटात उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांक, तसेच 800 रुपयांचे पारितोषिक आणि ट्रॉफी जिंकून मानाचा मुकुट मिळविला.




अंशिता सध्या सीताबाई संगई प्राथमिक शाळेत तिसरीत शिकत असून बुद्धिबळाविषयी तिला लहानपणापासूनच विशेष आकर्षण आहे. यापूर्वीही तिने 5 ते 9 नोव्हेंबर 2025 दरम्यान आयोजित अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय मानांकित बुद्धिबळ स्पर्धेत सहभाग घेत आपली चुणूक दाखवून दिली आहे. तसेच गोवा येथे सुरू असलेल्या स्त्रद्धष्ठश्च ङ्घश्चह्यस्र ष्ठह्वश्च 2025 स्पर्धेला भेट देत जगातील ग्रँडमास्टर्सकडून स्वाक्षऱ्या मिळवल्या. या अनुभवामुळे तिचा आत्मविश्वास आणि उत्साह आणखी बळकट झाला आहे.

# खा.अनिल बोंडे यांना धमकीच्या घटनेचा निषेध




महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, ( दि.19 )**– खासदार अनिल बोंडे यांना हैदराबाद येथील एका अज्ञात व्यक्तीकडून धमकी मिळाल्यानंतर भाजपा बडनेरा मंडळ आणि हिंदुसूर्य प्रतिष्ठान यांनी या प्रकाराचा निषेध केला.

या मागणीसाठी बडनेरा पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण यांना लेखी निवेदन देण्यात आले. आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी उमेश निलगीरे, किशोर जाधव, प्रदीप सोळंके, नरेंद्र धामणी, योगेश निमकर, तुषार अंभोरे, रवी रायकर, शैलेंद्र मेघवाणी, विरेंद्र ढोबळे, राहुल जाधव, विनय मोटवाणी, जयश्री अंबडकर, रोशनी वाकले, वंदना इंगोले, सतानाम कौर हुडा, तृप्ती वाठ यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# चुरणी-हतरू सर्कलमध्ये ‘त्रिकोणी सामना’होणार



नरेंद्र टाले



आलोक अलोकार



सहदेव बेलकर

### काय म्हणतात पदाधिकारी

शेतकरी–शेतमजूर यांच्या प्रश्नांवर तडफदार भूमिका घेतल्यामुळे प्रहार संपूर्ण ताकदीने मैदानात आहे. प्रहारचा विजय निश्चित आहे, असा विश्वास प्रहारचे तालुका अध्यक्ष नरेंद्र टाले म्हणाले. भाजपची तयारी सर्व पातळ्यांवर भक्कम आहे. काँग्रेस आणि प्रहार हे आरोपांत अडकले आहेत, पण विकास आम्ही दाखवला आहे. त्यामूळे विजय भाजपाचाच असेल. असे मत भाजपचे मंडळाध्यक्ष आलोक अलोकार यांनी व्यक्त केले. इतर पक्ष निवडणूक आली की दिसतात. काँग्रेसचे कार्यकर्ते मात्र लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी वर्षभर मैदानात असतात, त्यामूळे मतदारांचा विश्वास हा काँग्रेसवर आहे, असे काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सहदेव बेलकर म्हणाले.

## प्रहार-भाजप-काँग्रेस आमनेसामने

## गावोगाव सुरू झाल्या हालचाली

महासागर | प्रतिनिधी

**चुरणी,( दि.19 )**–जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका जवळ येताच चुरणी–हतरू सर्कलमध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून प्रहार जनशक्ति पक्ष, भाजप आणि काँग्रेस हे तिन्ही पक्ष थेट आमनेसामने येण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. मागील काही दिवसांत झालेल्या बैठका, पक्षनिहाय हालचाली आणि बदलत असलेल्या समीकरणांवरून या वेळी निवडणूक अत्यंत चुरशीची होणार हे स्पष्ट झाले आहे.

### भाजपचा पारंपरिक मतदार वर्ग सक्रिय

मेळघाटात भाजपचा मजबूत आधार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची अंमलबजावणी, पायाभूत सुविधांतील सुधारणा आणि गावोगाव घेतल्या जाणाऱ्या बैठका यामुळे भाजप पुन्हा एकदा ताकदीने उतरणार आहे. काही गावांत भाजप–प्रहार तर काही ठिकाणी भाजप–काँग्रेस अशी थेट टक्कर दिसेल.

### काँग्रेसचा परंपरागत गट पुन्हा एकत्र

काँग्रेसचे अनुभवी नेतृत्व तालुका पातळीवर सक्रिय झाले असून अनेक गावांत कार्यकर्त्यांच्या बैठकांमध्ये एकदिलाने लढण्याचा निर्णय होत आहे. ग्रामीण भागात काँग्रेसला अजूनही चांगला आधार मिळत असून संघटना पुन्हा मजबूत होत असल्याचे संकेत आहेत.

### सर्कलमध्ये मोठ्या फेरबदलाची शक्यता

युवकांचा ओढा, नवीन चेहरे, प्रहारचा वाढता प्रभाव आणि भाजप–काँग्रेसचे समीकरण बदलल्याने या वेळेस चुरणी–हतरू सर्कलमध्ये मोठा राजकीय फेरबदल होऊ शकतो. सध्या गावोगाव एकच चर्चा—कोण येणार मैदानात, कुणाला मिळणार तिकीट मिळणार ?, या निवडणुकीत तिन्ही पक्ष मैदानात उतरल्याने परिणाम अनपेक्षित असू शकतात. स्थानिक प्रश्न, नेतृत्व आणि संघटनशक्ती हे या वेळी निकाल ठरवणारे घटक ठरणार आहेत.

### प्रहार जनशक्ति पक्षाचे वर्चस्व वाढतेय

ग्रामीण भागात प्रहारची पकड गेल्या काही महिन्यांत लक्षणीयरीत्या वाढली आहे. शेतकरी–मनरेगा–कर्जमाफी–अतिवृष्टी नुकसान आणि मक्काङ्कसोयाबीन दरवाढ अशा मुद्द्यांवर प्रहारने आक्रमक भूमिका घेतल्याने जनाधार मजबूत झाला आहे. नरेंद्र टाले यांच्या नेतृत्वाखाली चुरणीङ्कहतरू भागात अनेक बैठकांना वेग आला आहे. बच्चू कडू यांच्या दौऱ्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवी ऊर्जा दिसून येत असून प्रहार हा या निवडणुकीतील निर्णायक पर्याय म्हणून समोर येत आहे.

# भाजपविरुध्द बजरंग दलाकडून असहकाराची भूमिका

## उमेदवारी डावलल्याने नाराजी

महासागर | प्रतिनिधी

**वरुड,( दि.19 )** – वरुड आणि शेंदुरजनाघाट नगरपरिषद निवडणुकांसाठी भाजपने जाहीर केलेल्या उमेदवारांच्या यादीत बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना स्थान न दिल्यामुळे तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढली आहे.

बजरंग दलाचे जिल्हा संयोजक विक्रम काळे यांनी सांगितले की, संघटनासाठी अनेक वर्षे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष करून बाहेरून आलेल्या किंवा गटबाजीतील लोकांना उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे आमचे कार्यकर्ते भाजपाच्या उमेदवारांना सहकार्य करणार नाहीत, असा निर्णय असंतुष्ट कार्यकर्त्यांनी घेतला आहे. या नाराजीमुळे भाजपाच्या विजयावर परिणाम होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. वरुडङ्कशेंदुरजनाघाट परिसरात या मुद्द्यावर मोठी चर्चा सुरू आहे. पक्षातील नाराजी उघड झाल्याने निवडणुकीचे चित्र बदलेल, असा अंदाज राजकीय विश्लेषकांनी व्यक्त केला आहे. बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग कमी झाल्यास भाजपाला महत्त्वाचे मतांतरण गमवावे लागू शकते, असेही निरीक्षकांचे मत आहे. दरम्यान, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये प्रहार, भाजप आणि काँग्रेस आमनेसामने असून हतरू सर्कलमध्ये मोठे फेरबदल होण्याची चिन्हे दिसत आहेत.

RNINO-46975/1985 | Dainik Mahasagar Amravati | Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.
आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ | महासागर अमरावती | मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# ग्रामीण आरोग्याचा समाजशास्त्रीय प्रवास सर्वसमावेशक आणि सशक्त भारताची पायाभरणी

भारताच्या विकासाच्या वाटचालीत ग्रामीण समाज हा कणा मानला जातो. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी दोन-तृतीयांश लोक अजूनही ग्रामीण भागात राहतात. अशा समाजाची प्रगती ही केवळ आर्थिक उत्पादनात कशी वाढ होते यावरच अवलंबून नसते, तर त्यांच्या आरोग्यस्थितीची गुणवत्ता कशी आहे, आरोग्यसेवा किती उपलब्ध आहे, सामाजिक सुरक्षितता किती मजबूत आहे आणि लोकांना त्यांच्या मूलभूत हक्कांबद्दल किती जागरूकता आहे, यावरही अवलंबून असते.

ह्याच वास्तवाच्या प्रकाशात दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी साजरा केला जाणारा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य दिन महत्त्वाचा ठरतो. या वर्षी २० नोव्हेंबर रोजी साजरा होणारा हा दिवस ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील अडचणी, संधी, नवीन उपक्रम आणि आरोग्य क्षेत्रातील सामाजिक असमानता यांवर चर्चा करण्याची संधी देतो.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून ग्रामीण आरोग्य म्हणजे केवळ वैद्यकीय सेवांचा विषय नाही; ते समाजरचनेचे, सामाजिक मूल्यांचे, आर्थिक परिस्थितीचे, स्त्री-पुरुष संरचनेचे, सामाजिक न्यायाचे आणि शासनव्यवस्थेच्या कार्यक्षमतेचे व्यापक प्रतिबिंब आहे.

ग्रामीण आरोग्याच्या इतिहासाकडे पाहिले तर स्वातंत्र्यानंतर देशाच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा पाया प्राथमिक आरोग्य केंद्रांतून घातला गेला. ग्रामीण जनतेच्या आरोग्य समस्यांकडे लक्ष देण्यासाठी उपकेंद्र, प्राथमिक केंद्र, तालुका रुग्णालये, जिल्हा रुग्णालये अशी शासकीय पातळीवरील रचना अस्तित्वात आली. मात्र, संरचना उभी राहिली तरी लोकांपर्यंत सेवा किती पोहोचली, या प्रश्नाचे उत्तर मात्र नेहमीच सकारात्मक नाही.

अनेक दशकांपासून ग्रामीण भागातील आरोग्यसेवांची कमतरता सुस्पष्ट आहे. डॉक्टरांची अनुपलब्धता, प्रशिक्षित कर्मचारी नसणे, औषधांची कमतरता, रुग्णवाहिकांची अनुउपलब्धता, दळणवळणातील अडथळे, कमी शिक्षण आणि गरिबी यामुळे आरोग्याच्या मूलभूत सेवांपासून ग्रामीण जनता अनेकदा वंचित राहते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आरोग्य म्हणजे आजार नसणे एवढेच नाही, तर आरोग्य व्यक्तीच्या सर्वांगीण कल्याणाचा विषय आहे. ग्रामीण समाजात आरोग्याच्या रूग्णतेला आणि आरोग्यसेवा वापरण्याला अनेक सामाजिक घटक कारणीभूत असतात.

जातिनिहाय व्याप्त असमानता, जमीनधारणेतील विषमता, महिलांची दुय्यम सामाजिक अवस्था, अंधश्रद्धा, कुपोषण, बालविवाह, स्वच्छतेचा अभाव आणि लोकांमध्ये आरोग्य शिक्षणाची कमतरता या समस्या आरोग्य व्यवस्थेच्या सुधारणेला अडथळा ठरतात.

ग्रामीण महिलांच्या आरोग्याचा विचार केला तरी त्यांच्याकडे आरोग्यासाठी स्वतंत्र निर्णयक्षमता नसते. कुटुंबातील घरगुती आणि कृषी कामाचा प्रचंड भार, प्रसूतीनंतर योग्य काळजी न मिळणे, कुपोषण, आणि मासिक पाळीविषयी असलेली गुप्तता या समस्या आजही गंभीरपणे समोर येतात. त्यामुळे आरोग्य हा विषय वैद्यकीय पेक्षा अधिक समाजशास्त्रीय बाजू घेऊन येतो.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य दिन आपल्याला या असमानतेच्या मूळ कारणांकडेही विचार करण्यास प्रवृत्त करतो. ग्रामीण समाजात आर्थिक असमानता ही आरोग्यासाठी सर्वात मोठी अडचण ठरते. अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन मजूर, तात्पुरते काम करणारे हातमजूर, हंगामी स्थलांतर करणारे कामगार, आदिवासी समाज या सर्वांना आरोग्याच्या सुविधांचा वापर करणे अधिक कठीण जाते.

त्यांच्या उत्पन्नाची अस्थिरता आणि दररोज मिळणाऱ्या मजुरीवर चालणारे जीवन हे त्यांना मोठ्या आजारांचे खर्च पेलू देत नाही. आरोग्य विम्याबद्दलच्या योजनांची जागरूकता कमी असल्याने सरकारी योजना लोकांपर्यंत पोहोचतच नाहीत.

अजूनही ग्रामीण भारतात औषधोपचारापेक्षा झटपट इलाज मिळवण्यासाठी लोक पारंपरिक उपचारपद्धतींकडे वळतात. अंधश्रद्धा, जादूटोणा, झाडफूंक, गावातील भोळेपणा, सामाजिक दडपण, चिकित्सकांवरील अविश्वास या कारणांमुळे आजारांचा वेळीच उपचार होत नाही.

आरोग्याचे सामाजिक निर्धारक घटक शिक्षण, स्वच्छ पाणी, स्वच्छता, पोषण, आर्थिक स्थैर्य यांची उपलब्धता नसल्यास कोणतीही आरोग्य योजना समाजावर दीर्घकालीन परिणाम करू शकत नाही. सरकारचे स्वच्छ भारत अभियान, उज्ज्वला योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, जनआरोग्य योजना अशा उपक्रमांचे उद्दिष्ट ग्रामीण समाजाचे आरोग्य सुधारण्याकडे आहे; मात्र या योजनांच्या परिणामकारकतेसाठी समाजातील असमानता आणि सामाजिक प्रतिबंध दूर करणे अधिक आवश्यक आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

ग्रामीण आरोग्य व्यवस्थेत आशा कार्यकर्त्यांचे योगदान विशेष महत्त्वाचे आहे. समाजाच्या प्रत्येक कुटुंबाशी संपर्क ठेवून गर्भवती स्त्रियांचे निरीक्षण करणे, बालकांचे लसीकरण करणे, आरोग्य विषयक जनजागृती करणे, पोषणाविषयी मार्गदर्शन करणे, क्षयरोग, मलेरिया, कुपोषण यांसारख्या आजारांची माहिती देणे अशा अनेक जबाबदाऱ्या त्या पार पाडतात.

या आशा कार्यकर्त्या ग्रामीण आरोग्य आणि शासन व्यवस्था यांच्यामधील दुवा मानल्या जातात. त्यांचे कार्य समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाचेही द्योतक आहे. ग्रामीण भारतातील आरोग्यविषयक आव्हानांची चर्चा करताना आदिवासी समाजाचा मुद्दा अधिक महत्त्वाचा ठरतो.

भौगोलिकदृष्ट्या दुर्गम भाग, दळणवळणाची कमतरता, जंगलातील वास्तव्य, आरोग्य सुविधांपासून दुरावा, शिक्षणाचा अभाव, गरीबी, पारंपरिक जीवनशैली, पोषणाची कमतरता, अंधश्रद्धा या सर्व कारणांमुळे ग्रामीण भागातील आणि विशेषतः आदिवासी भागातील आरोग्य समस्या अधिक तीव्र आहेत.

क्षयरोग, मलेरिया, कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यू दर या समस्या आजही गंभीर स्वरूपात दिसतात. त्यामुळे ग्रामीण आरोग्य सुधारण्यासाठी सर्वात प्रथम आदिवासी आणि अत्यंत वंचित गटांवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

ग्रामीण आरोग्य दिन साजरा करताना आपल्याला आरोग्याच्या पायाभूत सुविधांबद्दलही बोलावे लागेल. प्राथमिक आरोग्य केंद्रे ही ग्रामीण आरोग्य धोरणाची पहिली पायरी असली, तरी अनेक ठिकाणी ही केंद्रे कर्मचारीअभावी कार्य करू शकत नाहीत. डॉक्टर असले तरी तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता मोठी आहे.

काही ठिकाणी औषधे उपलब्ध नाहीत, निदान सुविधा अपुऱ्या आहेत, तर काही ठिकाणी इमारती आहेत पण उपकरणे नाहीत. हे चित्र बदलायचे असेल तर आरोग्य क्षेत्रात अधिक निधीची गुंतवणूक, लोकाभिमुख धोरणे आणि स्थानिक स्तरावर आरोग्य व्यवस्थापनातील पारदर्शकता आवश्यक आहे.

डिजिटल हेल्थ आणि टेलिमेडिसिन ही नवीन संधी ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला बळ देऊ शकते. मोबाईल नेटवर्क, डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि इंटरनेट सुविधांचा ग्रामीण भागात जलद प्रसार झाल्याने डॉक्टरांशी ऑनलाइन सल्लामसलत करणे शक्य होत आहे. तरीही या संधीचा पूर्ण लाभ घेण्यासाठी डिजिटल साक्षरता, तांत्रिक पायाभूत सुविधा आणि नेटवर्क सेवा सुधारण्याची गरज आहे.

आरोग्य शिक्षण हा ग्रामीण आरोग्याचा सर्वात महत्त्वाचा पाया म्हणता येईल. लोकांना आरोग्यविषयक माहिती मिळाल्यास ते स्वतःच्या आरोग्याबद्दल अधिक सजग होतात. लसीकरण, स्वच्छता, पोषण, स्त्रीआरोग्य, बालआरोग्य, मानसिक आरोग्य या विषयांवरील जनजागृती ही आरोग्य सुधारण्याची कळीची रणनीती आहे.

ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील सामाजिक न्यायाचा मुद्दाही दुर्लक्षित करता येत नाही. समाजात जात, वंश, आर्थिक वर्ग, लिंग अशा विविध आधारांवर लोकांमध्ये निर्माण होणाऱ्या असमानतेचा थेट परिणाम आरोग्याच्या उपलब्धतेवर होतो.

समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसून येते की वंचित समाजातील लोकांना आरोग्य सेवांसाठी अधिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे आरोग्य धोरणांची आखणी करताना सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा योग्य वापर करणे हे शासनाचे महत्त्वाचे कर्तव्य ठरते.

आरोग्य आणि पर्यावरणाचा संबंधही ग्रामीण समाजात महत्त्वाचा आहे. शुद्ध पाण्याची उपलब्धता, शौचालये, कचरा व्यवस्थापन, स्वच्छ हवा, सुरक्षित निवासस्थान, शाश्वत शेती पद्धती यांचा आरोग्यावर थेट परिणाम होतो.

हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या नवीन रोगांची जोखीमही ग्रामीण भागात अधिक आहे. त्यामुळे आरोग्याचा विचार करताना पर्यावरण संवर्धन आवश्यक बनते.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य दिन हा केवळ आरोग्यसेवा व्यवस्थेचा आढावा घेण्याचा दिवस नाही; तर तो ग्रामीण समाजाच्या समृद्धीच्या, सामाजिक समतेच्या, मानवाधिकारांच्या आणि सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रेरणा देणारा दिवस आहे.

मजबूत आणि कार्यक्षम ग्रामीण आरोग्य व्यवस्था असेल तरच देशाचा वास्तविक विकास घडू शकतो. आरोग्य हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे तो समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचवण्यासाठी शासन, आरोग्य कर्मचारी, स्थानिक संस्था, स्वयंसेवी संस्था, शेतकरी, महिला, युवक आणि संपूर्ण समाजाने एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

आज या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया की ग्रामीण भारतातील आरोग्यसेवा सर्वांसाठी, सर्वत्र आणि सर्वकाळ उपलब्ध करून देण्याचा. समान, समावेशक आणि न्याय्य आरोग्य व्यवस्था हीच सशक्त भारताची पायाभरणी आहे.

ग्रामीण आरोग्य बळकट करणे म्हणजेच राष्ट्राच्या भविष्याची आरोग्यपूर्ण वीट रचणे होय. ग्रामीण भारत निरोगी असेल, तरच भारताचा विकास खऱ्या अर्थाने सक्षम आणि शाश्वत ठरेल.

■ ■ ■

# सवंगड्यांच्या मैफिलीतील उबदार शेकोटी

इंग्रजी दिनदर्शिकेनुसार आणि ऋतुमानानुसार साधारण ऑक्टोबर महिन्याअखेर किंवा नोव्हेंबरच्या पहिल्यांदा आठवड्याच्या सुरुवातीस थंडीची चाहूल लागते.वातावरणातील हा बदल लक्षात घेऊन आई घरातील कपड्याच्या गाठोड्यातून स्वेटर, मफलर, कानपट्ट्या, टोप्या धुवायला काढायची. त्यावेळेस आताच्या सारखा कापडांचा बाजार जागोजागी नव्हता.

मोठ्या बहिण-भावाचे लहान बहीण भावाला कितीतरी वर्ष तेच ते उबदार कपडे घालावे लागायचे. मात्र त्यातही खूपच माया व प्रेम होते.कसलीही कुरकुर न करता आनंदाने घालायचो.गावाकडे आजूबाजूला शेतीचे व निसररम्य वातावरणा मुळे थंडी बऱ्याच प्रमाणात असायची. सकाळी भल्या पहाटे छान मंदिरातून घंटांचा आवाज यायचा.

कार्तिक महिन्यास प्रारंभ चालू झाल्यास कार्तिक स्नान व गावात दिंडी निघायची. त्यामुळे गावातील बाया माणसं सर्वजण सकाळी लवकर उठायचे त्यामुळे आम्हा पोरांनाही उठावंच लागायचं.चुलीवरील गरम-गरम पाण्याने अंघोळ केली की,कोवळ्या उन्हाची वाट बघायचो. मात्र सूर्योदयापूर्वी फारच थंडी वाजायची, म्हणून वाळलेलं गवत, काडी-कचरा वावरातील कपाशीच्या,मिरच्याच्या काड्या जमा करायचो आणि पेटलेल्या चुलीतील एखाद्या विस्तावाचा तुकडा सराट्यावर घेऊन जमा केलेल्या शेकोटीच्या वस्तुंना लावून शेकोटी पेटवायचो.

गावाकडील गरिबीच्या परिस्थितीमुळे अंगभर उबदार कपडे सगळ्यांकडे नसायचे.त्यात आम्हा मुलांना हाफ चड्डया असायच्या.त्यामुळे थंडी जाणवायची.महिला व पुरुष मंडळींना सुद्धा कानाला पांढरा रुमालाव्यतिरिक्त थंडीचे संरक्षण म्हणून दुसरे काही नसायचे. सूर्योदयापर्यंत एकदम सकाळी व रात्री साधारण जेवणानंतर थंडी जाणवायला लागली की शरीराला उब मिळावी म्हणून शेकोटी पेटवून बसायचो. एका-एका गल्लीमध्ये जवळपास दोन ते चार शेकोट्या पेटवलेल्या दिसायच्या.

जेथे ज्याचे विचार जुळले तेथील घोळक्यात जाऊन बसायचे.शक्यतो आम्हा लहान मुलांची शेकोटी वेगळी व मोठ्या बायका-माणसांची वेगळी असायची. त्यातील एक गट कि, ज्यांना बिडीपीण्याची सवय होती. त्यांना शेकोटीमुळे माचीस वापरायचं कामच नव्हतं, कारण बिडी शेकोटीतील विस्तवावर धरली की पेटवल्या जायची. हे एक विशेष. शेकोटीवर जो शेकायला येईल त्याला थोडी-थोडी शेकोटी पेटवायच्या वस्तू सोबत घेऊन याव्या लागायच्या.

आम्ही गावाकडे त्याला सासू म्हणायचं. शेकोटीसाठी आणलेल्या गवत, काड्या, लाकडांना सासूच का म्हणावं? अजूनही प्रश्न अनुत्तरीत आहे. प्रश्न असा आहे की, सासू मग ती मुलाची किंवा मुलीची सुद्धा असू शकते. शेकोटीवर उब घ्यायला जर मुलगा आला तर भविष्यातील त्याच्या पत्नीची आई म्हणजे सासू आणि मुलीने आणले तर तिच्या पतीची आई म्हणजे सासूच. यामधील तर्क अद्यापही लक्षात आला नाही.

शेकोटीत जाळणाऱ्या वस्तूंना सासूच का म्हणतात. एवढी वाईट असते का सासू? बरं! एवढं वाईट म्हणावं तर ती स्वतःला जाळून इतरांना थंडीपासून संरक्षण देते, उब देते. म्हणजे सासू वाईट नसतेच मुळी..! कारण ती आई असतें. मग ती मुलाची असो अथवा मुलीची. गमतीचा भाग वगळता, एखाद्या वस्तूसाठी ठेवलेलं नाव हे गंमतीने जरी लोकरूढितून, जनमानसातून आपल्यापर्यंत आले असले तरी,त्याचा अर्थ गहन असतो.

थंडीच्या दिवसात शेकोटी पेटवण्यासाठी जमवलेल्या गुराढोरांचे व बकऱ्यांचे खाऊन उरलेले गवत,काडी-कचरा सुद्धा असायचा. अर्थात त्या जळणाऱ्या वस्तू कि ज्यातून आग, विस्तव निर्माण होईल त्या आम्ही मुलं शेकोटीसाठी घराच्या पडक्या भिंतीच्या बाजूला जमा करून ठेवायचो. सकाळी पाच ते सहा वाजता घरच्यांनी अंथरुणातून उठवून दिल्यावर आम्ही तेच काम करायचो. कारण चुली जवळ जास्त वेळ बसू शकत नव्हतो. अन अंथरुणात लोळत पडल्यास सक्त मनाई होती.

एवढ्या सकाळी उठून अभ्यास करावा म्हटलं तर, तेवढे हुशार गटातील आम्ही मुळीच नव्हतो आणि करायचे म्हटलं तरी कुडकुडणाऱ्या थंडीत अभ्यासात मन लागायला तर हवं. म्हणून शरीराला उब मिळावी म्हणून शेकोटीचाच आनंद लुटायचो. त्यानिमित्ताने मित्रमंडळी सोबत खेळण व्हायचं. गप्पा चालायच्या.

प्रत्येक जण शेकोटीवर शेकायला येण्याअगोदर थोडं थोडं तरी शेकोटी पेटवण्यासाठी साहित्य सोबत घेऊन यायचेच. अन्यथा त्याला बसू देत नव्हते. ते अगदी सहाजिक होतं. जर शेकोटीची उब घ्यायची तर सगळ्यांना आणायलाच हवे. गावाकडील शेकोटीची हीच तर खरी गंमत असायची.

कोणतीही गोष्टी ही सगळे मिळून सहभागी होऊन करायचे.त्यामुळे एकमेकाविषयी आपुलकी, प्रेमाची भावना राहायची.एकलकोंडेपणा नव्हता. मग ती शेकोटी असो अथवा दिवाळीचा फराळ...! घरी रात्रीचे जेवण आटोपल्यावर मकाच्या कणसाच्या आतील भागापासून शेकोटी बनवायचो. त्याला आम्ही लेंडुरं म्हणायचो.आई त्याला लोखंडी टोपल्यामध्ये टाकून पेटवायची.त्याचीही घरगुती शेकोटी बनायची.त्यामुळे घरातील वातावरण रूम हीटर प्रमाणे उबदार व्हायचे.

शेकोटी पेटवल्यावर सर्वजण घोळक्याने गोल रिंगण करून बसायचे. शेकोटी विझायला लागली की, परत त्यावर काडी कचरा टाकून पेटवायचो. धूपट-धुवा यामुळे अंग पूर्ण काळसर पडायचे. मात्र त्याची कोण पर्वा करणार. काळ्या-गोऱ्याचा प्रश्नच नव्हता. शेकोटीतून मिळणारा आनंद महत्त्वाचा होता. स्वेटर,कान-टोपी,मफलर विकत घ्यायची परिस्थिती नव्हती.अन हो कदाचित नव्हती ते एका दृष्टीने बरच होतं. कारण सगळ्यांनीच थंडीचे उदार कपडे विकत घेतले असते. थंडी जाणवली नसती आणि मित्र-ांसोबत शेकोटीची आनंद अनुभवता आला नसता. मित्रांसोबतच्या मैफिलीचा आनंद लुटता आला नसता.

हल्ली शेकोटी वगैरे कुठे बघायला मिळते. सगळ्यांकडे उच्च दर्जाचे उबदार कपडे, पायात पायमोजे, जोडे,कान-टोप्या बघायला मिळत आहे. केवळ घरातल्या घरात भ्रमणध्वनी मध्ये मुलं गुंतून असतात.एवढेच काय! काही घरांमध्ये वातानुकूलक यंत्र आहे. ऋतुमानानुसार जेव्हा थंड हवे तेव्हा थंडी हवा. जेव्हा उब हवी तेव्हा उब ही त्यातून मिळवता येते. त्यामुळे अशी शेकोटी पेटवायचे मजा कोण घेईल? शेकोटीसाठी कचरा,काडी गवत लाकडे कोण जमा करणार? अन हो! पेटवलीच तर शेकोटीचा आनंद उपभोगायला येईल कोण?

प्रत्येक अबाल वृद्ध यंत्रमानवासारखी झाली आहेत. स्वतःला कुठल्या ना कुठल्या कामात व्यस्त करून घेतलं आहे. या जबाबदारीच्या अन मुलांकडून भविष्यातील वाढत्या अपेक्षामुळे मुले इतकी एकलकोंडी होत चालले आहे कि, त्यांच्या भावनिक विकास होताना दिसत नाही. त्यातून त्यांचं नैराश्य वाढत आहे. चेहऱ्यावरील खळखळणारा आनंद हरवला आहे. लोकांतापेक्षा एकांत वाढल्यामुळे त्यांची समाज, मित्र, नातेवाईक यांचे विषयी प्रेम आपुलकी दिसून येत नाही. कारण शेकोटीतून मिळणाऱ्या शारीरिक उबेसह मित्राबरोबर गोड गप्पांच्या मैफिलीतून मनाला उब मिळवून देणाऱ्या या व्यवस्था लुप्त होताना दिसून येत आहे.

अशा या शेकोटीतून थंडीपासून संरक्षण म्हणून अंगभर मिळणाऱ्या उबेसह मित्रमंडळी आणि सवंगड्या बरोबरच्या गप्पा-गोष्टीतून व खळखळ हास्यातून मनालासुद्धा ऊब मिळायची. एकलकोंडेपणाची भावना कमी होऊन, समूहातून आनंद मिळायचा. मित्रमंडळीमध्ये वाटून घेतलेल्या सुखदुःखातून जगण्याला बळ यायचं.

कारण ही शेकोटी फक्त शरीराला उब देत नव्हती तर, खळखळून हसायला लावणारे, प्रेम, आपुलकी माया, सहकार्याची जाणीव करून देणारं हक्काचे प्लॅटफॉर्म होते. मित्रांनो! तर चला पुन्हा एकदा उबदार प्रेमाची शेकोटी पेटवूया. या गार वातावरणात थंडीपासून संरक्षण मिळावे म्हणून शेकोटीच्या या ऊबदारपणातून शरीराबरोबर सवंगड्यांच्या गप्पा, गोष्टीं अन मैफिलीतून या एकलकोंड्या मनालाही उबदार बनवूया.

■ ■ ■

विनोद शेनफड जाधव
मासरूळ. ता जि. बुलडाणा.
9763282077

# काँग्रेसच्या दारूण पराभवाचाअन्वयार्थ

बिहार विधानसभा निवडणुकीतील कॉंग्रेसच्या दारुण पराभवानंतर, पक्षाने आपल्या भवितव्याबाबत गंभीरपणे विचार करायला हवा. प्रश्न फक्त बिहारमधील खराब कामगिरीपुरता मर्यादित नसून २०२४ च्या लोकसभा निवडणूकीनंतर निरनिराळ्या राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसची जी सुमार कामगिरी झाली, त्या बाबत पक्षाने आत्मपरीक्षण करण्याची नितांत गरज आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर हरयाणा, झारखंड,जम्मू-काश्मिर दिल्ली, महाराष्ट्र आणि बिहार या राज्यांत विधानसभेच्या निवडणुका झाल्या.यापैकी झारखंडचा अपवाद वगळता इतर राज्यांत कॉंग्रेसची कामगिरी अतिशय निराशाजनक झाली.

हरयाणा विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसचा विजय पक्का मानला जात असताना, पक्षाला अनपेक्षितपणे पराभवाचा सामना करावा लागला. त्या निवडणुकीत कॉंग्रेसला ३७ जागांवर समाधान मानावे लागले. झारखंडमध्ये, कॉंग्रेसने झारखंड मुक्ती मोर्चा या पक्षाबरोबर आघाडी करून विधानसभा निवडणुक लढवली होती.

या निवडणुकीत कॉंग्रेसला १६ जागांवर विजय मिळाला. कॉंग्रेसची या निवडणुकीतील कामगिरी बऱ्यापैकी होती. जम्मू-काश्मिर विधानसभा निवडणुकीत, नॅशनल कॉन्फरन्स बरोबर आघाडी करून निवडणुक लढवणाऱ्या कॉंग्रेसला केवळ ६ जागांवर विजय मिळाला. दिल्ली विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला आपले खातेही खोलता आले नाही.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत, कॉंग्रेसकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती, कारण त्या अगोदर झालेल्या लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेसने इतर पक्षांच्या तुलनेत सर्वात जास्त म्हणजे १३ जागा जिंकल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसची कामगिरी सरस होईल असे वाटले होते. परंतु महाविकास आघाडीतील इतर घटक पक्षांप्रमाणे कॉंग्रेसचीही विधानसभा निवडणुकीत घसरगुंडी झाली आणि कॉंग्रेसला केवळ १६ जागांवर समाधान मानावे लागले.

नुकत्याच पार पडलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला फक्त ६ जागांवर विजय मिळाल्याने,२०१० मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीनंतरची, कॉंग्रेसची ही सर्वात खराब कामगिरी मानावी लागेल.

२०१० मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला केवळ ४ जागांवर विजय मिळाला होता.महत्वाची गोष्ट म्हणजे वरील सहा राज्यांत कॉंग्रेसला मिळालेल्या जागांची बेरीज ८१ इतकी होते, त्या तुलनेत एकट्या बिहारमध्ये भाजपाला ८९ जागा मिळाल्या असून ही तुलनात्मक आकडेवारी कॉंग्रेसला नाउमेद करणारी आहे.



अभय गोखले

बिहारमध्ये भाजपाचा स्ट्राईक रेट ८८.१ टक्के आहे.त्या तुलनेत कॉंग्रेसचा स्ट्राईक रेट फक्त ९.८ टक्के इतकाच आहे.भाजपा आणि कॉंग्रेस हे अखिल भारतीय पक्ष असल्याने ही तुलनात्मक आकडेवारी सादर केली आहे.

बिहार विधानसभा निवडणुकांपूर्वी कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी काढलेली व्होटर अधिकार यात्रा, कॉंग्रेसला विधानसभा निवडणुकीत चांगले यश मिळवून देईल असे वाटले होते.कॉंग्रेसच्या नेत्यांना तर बिहारमध्ये आपल्या पक्षाची ताकद पुर्वीपेक्षा वाढल्याची खात्रीच वाटत होती. त्यामुळे जागा वाटपात आपल्या पक्षाला जास्तीत जास्त जागा मिळाव्या म्हणून कॉंग्रेसने चर्चेचे गुऱ्हाळ शेवटच्या दिवसापर्यंत सुरू ठेवले होते.

कॉंग्रेसने अखेर ६१ जागा आपल्या पदरात पाडून घेतल्या पण त्यापैकी फक्त ६ जागाच पक्षाला जिंकता आल्या. राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेला जो प्रतिसाद मिळाला त्याचे मतांमध्ये रूपांतर करण्यात कॉंग्रेसला अपयश आले.

सहा राज्यांतील विधानसभा निवडणुकांमधील कॉंग्रेसच्या खराब कामगिरीनंतर, राहुल गांधी यांच्या नेतृत्व क्षमतेबाबत भले मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बिहारचा इतिहास पाहिला तर १९९० नंतर तेथे कॉंग्रेसची अधोगती सुरू झाल्याचे आपल्या लक्षात येईल.

१९६७ आणि १९७७ चा अपवाद वगळता, १९९० पर्यंत बिहारमध्ये कॉंग्रेसची अव्याहत सत्ता होती. कॉंग्रेसची बिहारमध्ये खरी घसरगुंडी सुरू झाली ती, जेंव्हा पक्षाने लालूप्रसाद यादव यांच्या राजद बरोबर आघाडी करून निवडणुका लढवण्यास सुरुवात केली तेंव्हा.

लालूप्रसाद यादव हे कॉंग्रेसला जेवढ्या जागा सोडतील तेवढ्याच जागा कॉंग्रेसने लढवल्याने बिहारमध्ये कॉंग्रेसची वाढ खुंटली.कॉंग्रेसचा जनाधार घटला.पुढारलेल्या जाती, दलित आणि मुस्लिम समाज हा कॉंग्रेसचा मोठा मतदार वर्ग होता. त्यापैकी पुढारलेल्या जातींना, भाजपाने आपल्याकडे वळवले.मुस्लिम समाज राजद बरोबर गेला,तर दलित समाज संयुक्त जनता दल आणि भाजपा बरोबर गेला.

बिहार मधील दारूण पराभवानंतर, कॉंग्रेसचे इंडिया आघाडीतील वजन कमी झाले आहे. महत्वाचे म्हणजे प्रादेशिक पक्षांचे प्राबल्य असलेल्या राज्यांत कॉंग्रेस आता प्रादेशिक पक्षांसाठी लायबिलिटी होऊन बसली आहे. व्होट चोरी, निवडणुक आयोगाचा पक्षपातीपणा, विशेष सखोल फेरतपासणी मोहीम या मुद्द्यांवर कॉंग्रेसने बिहार विधानसभा निवडणुकीत भर दिला होता. परंतु या मुद्द्यांना बिहार मधील जनतेने म्हणावा तसा प्रतिसाद न दिल्याने आता कॉंग्रेसला नवीन मुद्दे शोधावे लागतील.

आपल्या सततच्या पराभवाची व्यवस्थितपणे कारणमिमांसा न करता, कॉंग्रेसचे नेते पक्षाच्या इतिहासाचे दाखले देऊन स्वतःची आणि कार्यकर्त्यांची फसवणूक करत आहेत. कॉंग्रेसने आता वर्तमानाचा आणि भविष्याचा विचार करायला हवा. इतिहासात फार काळ रमाल, तर इतिहास जमा व्हायला वेळ लागणार नाही, ही वस्तुस्थिती कॉंग्रेसने लक्षात घ्यायला हवी.आपले संस्थान खालसा व्हायची वेळ आली तरी, कॉंग्रेसचे नेते संस्थानिकांच्या थाटात वावरत आहेत. कॉंग्रेसने आपल्या कार्यपद्धतीत आमुलाग्र बदल केल्याशिवाय,ते भाजपाच्या इलेक्शन मशिनरी समोर टिकाव धरू शकणार नाहीत.

शेवटी सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कॉंग्रेस, तामिळनाडूमध्ये गेली ५८ वर्षे सत्तेच्या बाहेर आहे. पश्चिम बंगालमध्ये गेली ४८ वर्षे, कॉंग्रेस सत्तेच्या आसपास फिरकलेली नाही. उत्तरप्रदेशमध्ये कॉंग्रेस, गेली ३५ वर्षे सत्तेच्या बाहेर आहे. बिहारमध्येही तेवढीच वर्षे कॉंग्रेसला सत्ता मिळवता आलेली नाही.

गुजरातमध्ये गेली ३० वर्षे कॉंग्रेस, सत्तेपासून दूर आहे.मध्यप्रदेशात कमलनाथ मुख्यमंत्री असतानाचा काही काळ सोडला तर गेली २० वर्षे कॉंग्रेस सत्तेबाहेर आहे. आसाममध्ये गेली १० वर्षे कॉंग्रेस, सत्तेपासून दूर आहे. ओडिशामध्ये कॉंग्रेसला गेली २५ वर्षे सत्ता मिळवता आलेली नाही. दिल्लीमध्ये २०१३ नंतर गेली १२ वर्षे कॉंग्रेस नुसतीच सत्तेबाहेर नाही तर मध्यंतरी झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला भोपळाही फोडता आला नव्हता.

ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर कॉंग्रेसच्या अधोगतीबाबत आणखी काही चर्चा करण्याची आवश्यकता वाटत नाही.सततच्या पराभवामुळे कॉंग्रेसच्या नेत्यांचे आणि सामान्य कार्यकर्त्यांचे मनोबल खच्ची झाले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

अशा परिस्थितीत नजिकच्या भविष्यात कॉंग्रेस मधील बरेच नेते आणि कार्यकर्ते पक्षाचा त्याग करून भाजपा आणि इतर पक्षांत गेले तर त्यांना दोष देता येणार नाही.गांधी परिवाराचा करिष्मा केंव्हाच संपला आहे, हे वास्तव कॉंग्रेसने लवकरात लवकर स्विकारायला हवे, नाही तर कॉंग्रेसचे काही खरे नाही, असेच म्हणावे लागेल.

■ ■ ■

# कुपोषणामुळे मृत्यूचे वाढते प्रमाण चिंताजनक!

सरकार मेळघाटातमधील कुपोषण ग्रस्त भागात दुर्लक्ष करीत आहे हि बाब उच्च न्यायालयाने राज्य सरकारला फटकारल्यावरून स्पष्ट होते. आदिवासीबहुल मेळघाटात कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूचा प्रकार भयावह व चिंताजनक आहे, असा संताप मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ ला व्यक्त केला आणि या मुद्यावर सरकार बेजबाबदारपणाने काम करीत असल्याचे उच्च न्यायालयाने राज्य सरकारला चांगलेच फटकारले.

मेळघाट परिसरात जून २०२५ ते आतापर्यंत शून्य ते सहा महिन्यांच्या वयोगटातील ६५ बालकांनी प्राण गमावले असे न्या.रेवती मोहिते डेरे आणि न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठाने नोंदवले व असेही सांगण्यात आले की हा भयावह प्रकार आहे, सरकारने याबाबत चिंता दाखविली पाहिजे असे न्यायालयाने म्हटले आहे.

आपण म्हणतो की महाराष्ट्र विकासाच्या मार्गावर जात ही बाब सत्य आहे.परंतु राज्यातील अती दुर्गम भाग आजही अत्यंत पिछाडीवर आहे आणि हा प्रकार मेळघाटमध्ये वाढत्या बालमृत्यूच्या प्रमाणावरून स्पष्ट दिसून येतो. यावर सरकारने काम करण्याची नितांत गरज आहे.

मेळघाटात कुपोषणामुळे जूनपासून आतापर्यंत ६५ बालकांचा मृत्यू झाला ही बाब भयानक असुन अत्यंत चिंताजनक आहे. अमरावती जिल्ह्यातील आदिवासीबहुल मेळघाटात कुपोषणामुळे मुले, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या मातांच्या मृत्यूंची संख्या वाढत असल्याची अनेक जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकांवर न्या. रेवती मोहिते डेरे आणि न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठाची सुनावणी झाली.



जूनपासून आतापर्यंत शून्य ते सहा महिने वयोगटातील ६५ बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू होणे ही राज्यासाठी अत्यंत चिंताजनक आणि भयावह बाब आहे. सरकारने हे गांभीर्याने लक्षात घेतले पाहिजे, असे खंडपीठाने राज्य सरकारला सुनावले.

राज्य सरकार सार्वजनिक आरोग्याच्या प्रश्नावर गंभीर नाही,अशीही टिप्पणी न्यायालयाने केली आहे. सरकार अनेक योजना राबवित असते परंतु राज्यातील मेळघाटात सारख्या अनेक दुर्गम भागाकडे लक्ष नसल्याचे मेळघाटाच्या वाढत्या कुपोषणाच्या मृत्यूवरून स्पष्ट दिसून येते.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

राज्यामध्ये अनेक सरकारे आलीत आणि गेलीत परंतु सर्वांनीच अती दुर्गम भागाकडे दुर्लक्ष केले आणि त्याचे प्रायश्चित्त आजही मेळघाटात सारख्या अती दुर्गम भागातील आदिवासी भागांमध्ये कुपोषणामुळे बालमृत्यूचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते.

आज देश स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालीत तरीही राज्यासह देशातील अनेक अती दुर्गम भागातील नागरिकांचे हाल बेहाल होतांना दिसतात. आजही अती दुर्गम भागात पुरेशा आरोग्य सुविधा उपलब्ध नाही, शिक्षणासाठी गावकऱ्यांना व विद्यार्थ्यांना आटापिटा करावा लागतो, रूग्णांना झोळीच्या सहाय्याने अनेक किलोमीटर अंतरापर्यंत रुग्णालयात पायदळ न्यावे लागते ही भयावह परिस्थिती राज्यासह भारतातील अनेक दुर्गम भागातील राज्यांमध्ये दिसून येते. त्यामुळे राज्यासह देशात सर्वच काही ठीक आहे असे म्हणता येणार नाही.

अतीदुर्गम भागातील परिस्थितीचा विचार करून नियुक्ती केलेल्या डॉक्टरांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने सरकारने डॉक्टरांच्या प्रती पाऊले उचलली पाहिजेत व तेथील परिस्थिती सुधारण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या पाहिजेत. सर्वच पक्षांचे राजकीय पुढारी अति दुर्गम भागात मुद्दाम दुर्लक्ष करतात कारण त्यांना याठिकाणी पाहिजे त्या प्रमाणात मतदान होत नसावे हे सुद्धा कारण राहु शकते यालाही नाकारता येत नाही.

सरकारची यंत्रणा अति दुर्गम भागात विकसित झाली तर आदिवासी नागरिकांना योग्य लाभ अवश्य होईल.अतिशय दुर्दैवी परिस्थिती आहे की सरकार सार्वजनिक आरोग्याचा मुद्दा सहज घेत आहेत . विशेषतः आदिवासी भागात परिस्थिती बिकट आहे. यावर सरकारने लक्ष केंद्रित करून मेळघाटात सारख्या अति दुर्गम भागातील नागरिकांना योग्य न्याय देऊन त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे.

■ ■ ■

# 'तारीख पे तारीख' होणार नाही

## नवीन कायद्यामुळे शिक्षेचे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत नेणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १९ :



आपल्या देशात दीडशे वर्षांपासून अस्तित्वात असलेले फौजदारी कायदे हे ब्रिटिशांनी भारतीयांवर केवळ 'राज्य' करण्याच्या आणि वर्चस्व गाजवण्याच्या उद्देशाने तयार केले होते. त्या कायद्यात आपण केवळ 'प्रजा' होतो. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणलेले नवीन कायदे हे जनतेला 'विश्वस्त' मानणारे आणि दंडापेक्षा 'न्याया'ला प्राधान्य देणारे आहेत, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पूर्वीसारखे तारीख पे तारीख आता करता येत नाही. नवीन कायद्यामुळे शिक्षेचे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत नेले जाईल, असेही फडणवीस म्हणालेत

केंद्र शासनाने भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम हे नवीन फौजदारी कायदे १ जुलै २०२४ पासून देशभरात लागू केले आहे. या नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित प्रदर्शनाचे आयोजन २३ नोव्हेंबर पर्यंत आझाद मैदान, मुंबई येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन आज १९ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

जुने कायदे आणि नवीन कायदे यातील फरक स्पष्ट करताना मुख्यमंत्री म्हणाले की, ₹लोकशाहीमध्ये निवडून आलेले सरकार हे जनतेचे शासक नसून 'विश्वस्त' असते, ही भूमिका नवीन कायद्यांतून स्पष्ट होते. म्हणूनच जुन्या 'दंड संहिते'चे रूपांतर आता 'भारतीय न्याय संहिते'त झाले आहे. तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता ही आता 'नागरिक सुरक्षा संहिता' बनली आहे. इंग्रजांच्या कायद्यात भारतीयांना केवळ 'सब्जेक्ट' मानले गेले होते, अनेक तरतुदी लोकशाहीला मारक होत्या. आता त्या इतिहासजमा झाल्या आहेत.

कायदे बदलण्यामागील भूमिका मांडताना फडणवीस म्हणाले, १८६०, १८७२ किंवा १८९८ मध्ये तयार झालेले कायदे सद्यस्थितीत कालबाह्य ठरत होते. गेल्या शतकात समाजात मोठे परिवर्तन झाले आहे, गुन्हे करण्याच्या पद्धती बदलल्या आहेत आणि तंत्रज्ञान प्रगत झाले आहे. पूर्वीच्या कायद्यात तांत्रिक पुरावे ग्राह्य धरण्यात अडचणी येत होत्या. मात्र, नवीन 'भारतीय साक्ष अधिनियमा'मुळे तंत्रज्ञानाने दिलेली टूल्स आता पुराव्यासाठी वापरता येणार आहेत. हे परिवर्तन काळाची गरज होती.

क्रिमिनिल जस्टिस सिस्टिममधले पूर्ण सायकल या ठिकाणच्या प्रदर्शनात आहे. गुन्हा घडल्यानंतर तातडीने पोलीस घटनास्थळी पोहचतात. नव्या तंत्रांचा वापर केला जातो. अनेकवेळा मोठमोठ्या गुन्ह्यांमध्ये गुन्हेगार सुटायचे. २०१३ मध्ये आपला रेट ऑफ कनव्हिक्शन ९ होता. १०० लोकांवर गुन्हे झाले तर ९१ लोक सुटून जायचे. मागच्या दहा वर्षांत हे प्रमाण ५३ टक्क्यांपर्यंत वाढलं आहे. ९ टक्के ते ५३ टक्क्यांचा प्रवास चांगला आहे पण आणखी चांगला करायचा आहे. १४ शासन निर्णयांतून आपण इथवर पोहचलो आहोत. पण जे नवीन कायदे तयार झाले आहे ते आपल्याला ९० टक्क्यांपर्यंत नेऊ शकतात असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

# तुकडे बंदीतील अनियमित जमीन व्यवहार
# आता निःशुल्क नियमित होणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :
महाराष्ट्र शासनाने तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन करून झालेल्या छोट्या भूखंडांच्या व्यवहारांना नियमित करण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला असून, महसूल विभागाने यासाठी आवश्यक कार्यपद्धती जाहीर केली आहे.




महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार ही प्रक्रिया सर्व जिल्हाधिकारी आणि संबंधित महसूल अधिकाऱ्यांना लागू करण्यात आली आहे. अनेक वर्षांपासून रखडलेल्या छोट्या भूखंडांच्या नोंदी, सातबाऱ्यावरील शेरा आणि फेरफार यांसंदर्भातील अडथळे दूर करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरत आहे.

शासनाच्या या निर्णयाचा राज्यातील सुमारे ६० लाख कुटुंबांना म्हणजेच अंदाजे तीन कोटी नागरिकांना मोठा फायदा होणार असून, लाखो लोकांच्या मालमत्तेला आता कायदेशीर स्वरूप मिळणार आहे. विशेष म्हणजे, तुकडेबंदी कायद्याविरुद्ध व्यवहार हा वादग्रस्त शेरा सातबाऱ्यावरून कायमचा काढून टाकण्याची तरतूद करण्यात आली आहे.

तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन करून १५ नोव्हेंबर १९६५ पासून १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत झालेले व्यवहार या नवीन नियमांतर्गत नियमित करण्याची परवानगी देण्यात आली आहे. याबाबत महसूल विभागाने अधिकृत राजपत्रही प्रसिद्ध केले.

ही कार्यपद्धती मुंबई, पुणे आणि नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतील क्षेत्रांना लागू राहणार असून, निवासी व वाणिज्यिक झोन, छावणी क्षेत्र, प्रादेशिक आराखड्यातील अकृषिक झोन आणि गावठाणालगतचे पेरीफेरल एरिया ही यात समाविष्ट आहेत.

आतापर्यंत अशा भूखंडांची नोंद सातबाऱ्यावर इतर हक्कात केली जात असे किंवा अनेक वेळा नावच लागत नसे. मात्र आता शासकीय निर्णयामुळे प्रत्यक्ष कब्जेदाराचे नाव सातबाऱ्यावरील मुख्य सदरात नोंदवले जाणार आहे. फेरफार रद्द झाल्यास तसा फेरफार पुन्हा तपासून मंजूर करण्याचे निर्देश दिले आहेत.

सातबाऱ्यावरील शेराबाबत नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर तक्रारी केल्या होत्या. अनेकांच्या जमिनींच्या नोंदी तुकडेबंदी कायद्याविरुद्ध व्यवहार या शेरामुळे अडकून पडल्या होत्या. आता शासनाने हा शेरा कायमचा काढून टाकण्याचा निर्णय घेतल्याने संबंधित भूखंडांना कायदेशीर आधार मिळणार आहे. तसेच, नागरिकांनी पूर्वी केवळ नोटरी किंवा स्टँप पेपरवर व्यवहार केले असतील तरीही दस्त नोंदणी करण्याची सवलत देण्यात आली आहे.

मंडळ अधिकारी आणि तलाठी नागरिकांना दस्त नोंदणीसाठी प्रोत्साहन देतील.

मुद्रांक शुल्क भरल्यानंतर दस्त नोंदणी करून अशा व्यवहारांनाही सातबारावर योग्य जागा मिळणार आहे. ही प्रक्रिया नागरिकांना तांत्रिक अडचणींपासून मुक्त करण्यासाठी मोठे पाऊल मानले जात आहे.

**व्यवहारांवर कोणताही अडथळा नाही**

एकदा भूखंडाचे व्यवहार नियमित झाल्यानंतर त्या जमिनीच्या पुढील विक्री, हस्तांतरण किंवा अन्य व्यवहारांवर कोणताही अडथळा राहणार नाही, असे शासनाने स्पष्ट केले आहे.

आजवर या तुकड्यांना नियमित करण्यासाठी जमिनीच्या बाजारभावाच्या २५ टक्के पर्यंत दंड आकारला जात होता; त्यात नंतर घट करून ५ टक्के दंड करण्यात आला. मात्र, तरीही मोठ्या प्रमाणावर नागरिक पुढे येत नव्हते.

त्यामुळे शासनाने आता कोणतेही शुल्क न आकारता व्यवहार नियमित करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय, निमशहरी आणि ग्रामीण भागातील सर्वसामान्य भूखंडधारकांना मोठा दिलासा मिळत आहे.

## बेपत्ता महिला जिल्हाप्रमुख वडिलांच्या घरी सुरक्षित

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. १९ :



नगरपालिकेच्या निवडणुकीत पक्षाने उमेदवारी नाकारल्यामुळे आरमोरी येथील शिंदेसेनेच्या महिला जिल्हाप्रमुख अर्चना संतोष गोंदोळे यांना मानसिक धक्का बसल्याचा दावा करत २० तासांपासून बेपत्ता झाल्याने मोठे राजकीय नाट्य गडचिरोली जिल्ह्यात रंगले होते. मात्र, पोलिसांच्या शोधानंतर गोंदोळे या आरमोरीतील त्यांच्या वडिलांच्या घरी सुखरूप आढळून आल्याने या बेपत्ता नाट्यावर पडदा पडला.

तथापि, या नाट्यानंतर दुसऱ्याच दिवशी उमेदवारी मिळालेल्या महिला पदाधिकाऱ्यास अर्वाच्च शिवीगाळ केल्याप्रकरणी गोंदोळे यांच्यासह आणखी एका महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरमोरी पालिकेच्या वॉर्ड क्र. ६ मधून नगरसेवकपदासाठी इच्छुक असलेल्या महिला जिल्हाप्रमुख अर्चना गोंदोळे यांना पक्षाने डावलून दुसऱ्या पदाधिकाऱ्यास एबी फॉर्म दिला. यामुळे गोंदोळे यांनी नाराजी व्यक्त करत पालिका आवारातून बाहेर पडल्यानंतर घरी परतल्याच नाहीत.

१८ नोव्हेंबर रोजी त्यांचे पती संतोष गोंदोळे यांनी पक्षाच्या व्हॉट्सअप ग्रुपवर संदेश टाकून पक्षाच्या जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांवर थेट गंभीर आरोप केले. पत्नीला तिकीट नाकारल्याने मानसिक धक्का बसला असून, ती बेपत्ता आहे, तसेच पत्नीच्या जीविताला काही बरेवाईट झाल्यास संबंधित पदाधिकारी जबाबदार राहतील, असा इशाराही त्यांनी दिला होता.

या नाट्यमय घडामोडीनंतर पोलिसांनी तातडीने शोध घेतल्यानंतर अर्चना गोंदोळे या आरमोरीतील त्यांच्या वडिलांच्या घरी सुरक्षित आढळून आल्या. आरमोरी पोलिसांनी या वृत्ताला दुजोरा दिला. दरम्यान, शिंदेसेनेचे जिल्हाप्रमुख संदीप ठाकूर यांनी मात्र हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. ही केवळ राजकीय स्टंटबाजी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# बिल्डरवर भरदिवसा गोळीबार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १९ :



कांदिवली-चारकोप परिसरात भरदिवसा एका तरुण बांधकाम व्यावसायिकावर गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली. या गोळीबारात बिल्डर गंभीर जखमी झाले असून, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. फ्रेंडी दिलीमा भाई असे जखमी बिल्डरचे नाव आहे.

तरुण बिल्डर फ्रेंडी दिलीमा भाई हे त्यांच्या कारमध्ये बसले असताना, अचानक दोन अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर हल्ला केला. यावेळी, अज्ञातांकडून दिलीमा भाई यांच्यावर दोन ते तीन राऊंड फायर करण्यात आले. यातील दोन गोळ्या फ्रेंडी यांच्या पोटात घुसल्याने ते गंभीर जखमी झाले. हल्लेखोर गोळीबार करून तात्काळ घटना स्थळावरून पळून गेले. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे वृत्त आहे.

# मनोरा आमदार निवासाला उपसभापतींकडून डेडलाईन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १९ :
मनोरा आमदार निवासाच्या बहुचर्चित नव्या इमारत प्रकल्पाला अखेर कडक डेडलाईन मिळाली आहे. २०२८ पर्यंत काम पूर्ण झालंच पाहिजे, कोणताही विलंब चालणार नाही, असा स्पष्ट आणि ठाम इशाराच विधानसभा उपसभापती अण्णा बनसोडे यांनी दिल्याने प्रशासनाची धडधड वाढली आहे.



उपसभापती बनसोडे यांनी सोमवारी प्रत्यक्ष स्थळाला भेट देत कामाची सविस्तर पाहणी केली आणि त्यानंतर सुरू झाली ती तुफानी समीक्षा.

पाहणीदरम्यान त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना एक एक मुद्द्यावर प्रश्न विचारत गुणवत्ता, सुरक्षितता आणि कामाच्या गतीचा बारकाईने आढावा घेतला. कामाचा वेग ठीक आहे, पण काही तांत्रिक बाबी अजूनही संवेदनशील आहेत त्यावर तातडीने लक्ष द्या, अशा शब्दांत त्यांनी प्रशासनाला सज्जड सूचना केल्या.

दरम्यान, या प्रकल्पाकडून राज्य सरकारच्या मोठ्या अपेक्षा आहेत. कारण हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर आमदारांसाठी आधुनिक सुविधा, अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त आणि सर्वतोपरी सुरक्षित असा महत्त्वाचा निवास उपलब्ध होणार आहे. अनेक वर्षांपासूनचा निवासाचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

पण तरीही मोठा प्रश्न कायम आहे तो हा की, २०२८ च्या कडक मर्यादेत मनोरा प्रकल्प वेळेत उभा राहील का? उपसभापतींचा इशारा आणि सध्याची गती पाहता, पुढील काही महिने निर्णायक ठरतील.

# शेतकऱ्यांच्या हिताची वसई सोसायटी

**लोकजागर**




पुरातन काळापासून आपल्या भारताची गणना हि कृषी संपन्न देशात करण्यात येत आहे. विविध नैसर्गिक संपत्तीने नटलेल्या ह्या देशात शेतकरी हा आजही राजा समजला जातो. परंतु आता शेती कमी होऊ लागल्याने आहे ती शेती टिकवून त्या शेतीतून जास्तीत जास्त उत्पन्न कसे घेता येईल ह्यावर भर देण्याची वेळ आली आहे.

शेतकऱ्यांच्या अडी अडचणी सोडविण्याच्या प्रयत्नातूनच निर्माण झालेल्या वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीने गेली सत्तर वर्षे 'शेतकरी सुखी तर देश सुखी' हे बोधवाक्य प्रमाणे मानून आपली वाटचाल सुरु ठेवली आहे.

सोसायटीची वाटचाल सुरुवातीला अत्यंत खडतर अशी होती. २० एप्रिल १९४० साली रामभाऊ हिराजी राऊत, गणेश जगन्नाथ वर्तक, तोमू अंतोन सील ह्यांच्या पुढाकाराने ३३ प्रवर्तकांनी मिळून सोसायटीची स्थापना केली. वसईतील त्यावेळी पानवेलीची लागवड मोठ्या प्रमाणावर होत होती.

पानवेलीच्या बागायतीसाठी लागणारी पेंड, काथ्या, बांबू, टोकरे इत्यादी माल एकाच ठिकाणी व योग्य दराने मिळावा, शेतकऱ्यांना खते आणि शेती बागायतीला लागणारे सामान योग्य दरात मिळावे ह्यासाठी प्रयत्न करणाऱ्या ह्या सोसायटीला स्थापनेच्या वर्षातच अनेक समस्यांना सामोरे जावे लागले.

त्याकाळी बागायती शेती हाच ह्या ठिकाणचा मुख्य व्यवसाय होता. सोसायटीने शेतकर्यांना कर्जाऊ रक्कमा देऊन शेतकर्यांना उभारी देण्यासाठी हात दिला. संकटे आणि स्थैर्य ह्या उन पावसाच्या काळाचा सात आठ वर्षाच्या अनुभवामुळे आणि व्यापारी क्षेत्रात पदार्पण केल्याने व नेतृत्वाच्या दुरदर्शीपणामुळे अखेर सोसायटीला आर्थिक स्थैर्य येऊ लागले.

काम करणाऱ्याना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते असे म्हणतात. परंतु नेतृत्व सक्षम असेल तर कितीही संकटे आली तरी त्यावर मात करता येते. सोसायटीलाही आतापर्यंत दूरदृष्टी असलेले सक्षम नेतृत्व सातत्याने मिळत गेल्याने सोसायटीची प्रगती होत गेली.

सोसायटीच्या स्थापनेपासून चेअरमन असलेल्या रामचंद्र हिराजी राऊत ह्यांनी आपल्या परीने सोसायटीची प्रगती पाहिली. ह्या ठिकाणच्या बागायतीमधून भरघोस पिके काढण्यासाठी शेतकऱ्याला विविध प्रकारची औषधे, खते व अवजारे यांची आवश्यकता असते. हे ओळखून सोसायटीने आपल्या कार्यक्षेत्रात पाच गोदामे उघडून त्यातून विविध जातीच्या पेंडी, नाना पकारची खते, औषधे आणि अवजारांचा पुरवठा शेतकऱ्यांना केला. त्याच बरोबर होळी, वरखड, देवाळे, किरवली व उमेळे येथे धन्य व किराणा माल विक्रीची केंद्रे सुरु केली. तसेच सिमेंट, लोखंडी पत्रे, पाईप इत्यादी इमारतीसाठी लागणाऱ्या साहित्याचा पुरवठा देवतलाव डेपोतून सुरु केला.

१९६० साली सोसायटीने आपला पहिला ट्रक विकत घेतला. १ ऑगस्ट १९७६ साली बर्मासेल कंपनीच्या राष्ट्रीयकरणानंतर भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. ह्या कंपनीची सहकारी क्षेत्रातील पहिली वितरक सोसायटी म्हणून संस्थेने मान मिळविला. सोसायटी आज वसई तालुक्यातील ग्राहकांना घरपोच चांगली सेवा देत आहे.

महिला सबलीकरणावर भर देताना सध्याच्या संचालक मंडळाने महिला कर्मचाऱ्यांनाही आता सोसायटीच्या सेवेत सामावून घेतले आहे. ह्या संस्थेने ७३ वर्षे प्रगतीची वाटचालच केली नाही तर वेगवेगळे विक्रमही प्रस्थापित केले आहेत. ह्या संस्थेचे भाग भांडवल आज ४,३४,३२५ रुपये इतके असून सुमारे २९ लाख ५२ हजार रुपयांच्या ठेवी सभासदांनी ठेवल्या आहेत.

आज संस्थेची उलाढाल ही ६० कोटी रुपयांवर पोहोचली असून संस्थेची गुंतवणूक २ कोटी पर्यंत पोहोचली आहे. संस्थेची घोडदौड सुरु असून वसई परिसरातील शेतकरी बांधवाना ₹शेतकरी राजा पुढे चल, तुज्या मागे मी भक्कमपणे उभी आहे असा संदेश देत आहे.



# इलेक्ट्रॉनिक्स कंपनीचा मालक बनला सागर

महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रत्येक तरुण नोकरीच्या शोधात असतात पण, काही तरुण असेही असतात जे नोकरी न करता इतरांना उत्पन्न देण्यासाठी कंपनी स्थापन करतात आणि स्वतःचे नशीब बदलण्यासाठी रात्रंदिवस झटतात.

देशात असे अनेक तरुण उद्योजक आहेत ज्यांनी अल्पावधीतच आपल्या व्यवसाय आणिकमाईने लोकांना चकित केले आहेत. या यादीत नोएडाच्या सागर गुप्ता यांचेही नाव आहे. या उद्योजकाने तरुण वयात आपल्या वडिलांसह अवघ्या चार वर्षात करोडो रुपयांचे व्यवसाय साम्राज्य उभे केले.

नोएडाच्या या तरुणाने ज्या वयात यश संपादन केले त्या वयात फार कमी लोकांच्या नशिबात असे यश असते. २२ व्या वर्षी दिल्ली विद्यापीठाच्या प्रतिष्ठित श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्समधून बी. कॉम पूर्ण केल्यानंतर सागरने नोकरीच्या शोधात बाहेर न पडत धाडस दाखवून आपल्या वडिलांसोबत व्यवसाय सुरू केला.

सुरुवातीला त्याला सीए व्हायचे होते पण नशिबाने दुसरेच प्लॅन केले होते. २०१७ मध्ये सागरच्या कारकिर्दीत मोठे वळण आले. एका इलेक्ट्रॉनिक्सची स्थापना करताना सागर गुप्ताकडे ना कोणता व्यावसायिक अनुभव होता, ना ते कोणत्या व्यासायिक कुटुंबातील आहेत. सागर एक तरुण उद्योजक आहेत ज्यांना त्यांच्या उत्पादन आणि मेहनतीवर विश्वास होता व आपल्या वडिलांसोबत व्यवसाय साम्राज्य निर्माण केले.

सागर गुप्ताच्या एक्का इलेक्ट्रॉनिक्सने नोएडामध्ये नवीन सुविधा उभारण्यासाठी पुढील तीन वर्षात एक हजार कोटींच्या गुंतवण्याचा निर्णय घेतला असून आता कंपनी वॉशिंग मशिन, स्मार्ट घड्याळ, एअर फोन, हेडफोन आणि टू वायरलेस स्टिरिओ यांसारख्या उत्पादनांची निर्मिती करण्यासाठी एक नवीन प्लांट उभारणार आहे.

आपल्या मुलाने चार्टर्ड अकाउंटंट बनावे, अशी सागर गुप्ता यांच्या वडिलांची इच्छा होती. यासाठी सागरने सीए परीक्षेच्या तयारीसाठी कोचिंग सुरू केले, पण नंतर २०१७ मध्ये मॅन्युफॅक्चरिंग व्यवसायात उतरण्याचा निर्णय घेतला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर सागरने वडिलांसोबत LED टेलिव्हिजन युनिट एक्का इलेक्ट्रॉनिक्सची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. सागरची कंपनी, एक्का इलेक्ट्रॉनिक्स आज शंभरहून अधिक कंपन्यांना एलईडी टीव्ही पुरवते. तर एक्का इलेक्ट्रॉनिक्सची उत्पादन सुविधा हरियाणाच्या सोनीपत येथे उपलब्ध आहे.

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# नागभीड, घुग्घुस, वरोरात धडाधड अर्ज बाद

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १९ :
चंद्रपूर जिल्ह्यात आज झालेल्या छाननीत छोट्या नगरपालिकांपासून पक्षप्रमुखांच्या बालेकिल्ल्यांपर्यंत एकाच दिवशी राजकीय ग्रहण लागल्याची परिस्थिती तयार झाली.

नागभीडमध्ये प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला सर्वात मोठा धक्का बसला–नगराध्यक्षपदाच्या उमेदवारासह तब्बल सहा नगरसेवकांचे अर्ज सूचकांची संख्या अपुरी म्हणून बाद झाल्याने वंचितच निवडणुकीपासून वंचित राहिली. पण धक्का फक्त वंचितपुरता नाही.

वरोरा येथे अजित पवार गटाची मनीषा नेरकर स्पर्धेबाहेर गेले तर ब्रम्हपुरीत भाजपचे अरविंद नंदूरकर एबी फॉर्म नसल्याने बाद झाले. प्रत्येक पॅनेलमध्ये एक ना एक मोठं नाव बाद झाल्यानं जिल्ह्यात राजकीय त्सुनामीचा माहोल आहे.

एकीकडे ११ पालिकांच्या नगराध्यक्षपदासाठी रिंगणात १२१ दावेदार उतरल्यानंतरही आज झालेल्या छाननीत जिल्हाभरात अर्जांची कत्तलच झाल्याची चर्चा आहे. अपक्ष, भाजप, शिवसेना-ठाकरे, राष्ट्रवादी-अजित पवार गट आणि वंचित यातील कोणताही पक्ष वाचला नाही. नागभीड प्रभाग ९ मधील मनीषा मानापुरेंपासून घुग्घुस, भिसी, गडचांदूर, ब्रम्हपुरी, भद्रावती, वरोरा येथे सर्वत्र नामांकन रद्द झाले.

भिसीत नगराध्यक्षपदाचे चार अर्ज बाद झाले तर गडचांदूरमध्ये ११ पैकी एक, भद्रावतीत तीन अतिरिक्त अर्ज, वरोऱ्यात दोन नामांकन थेट अपात्र झाले. जिल्हाभरातील नगरसेवक पदाच्या १७१ अर्जांपैकी १३ अर्जांना लाल-शाईची रेष लागल्याचे दिसून आले.

प्रशासनाचे काटेकोर तपास अभियान, की निवडणूक रणांगणातील पहिला राजकीय शह-काटशह? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात असून, संपूर्ण जिल्ह्यात रंगलेली निवडणुकीची पिटे थेट छाननीच्या जेरबंदीत अडकली आहेत.

# संविधानाचा मार्ग स्वीकारा

## आत्मसमर्पित नक्षली नेता भूपतीचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. १९ :
नक्षलवादी संघटनेचा कुख्यात माडवी हिडमा मंगळवारी सुरक्षा दलासोबत झालेल्या चकमकीत ठार झाला. त्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी नक्षलवादी विरोधी मोहीम अधिक तीव्र केली आहे. या पार्श्वभूमीवर आत्मसमर्पित नक्षल नेता भूपतीने चित्रफित जारी करून उर्वरित नक्षलवाद्यांना हिंसा सोडा, संविधानाचा मार्ग स्वीकारा, असे आवाहन केले आहे.



भूपती याने आपल्या जुन्या साथीदारांना थेट आवाहन करत, ह्यबंदुकीच्या मार्गाने आजवर खूप काही गमावले, यातून काहीही साध्य होऊ शकले नाही. त्यामुळे आता शस्त्रे खाली ठेवा आणि मुख्य प्रवाहात या, असे आवाहन केले आहे. सध्याची नक्षल चळवळीतील परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे, बंदुकीच्या मार्गाने काहीही साध्य झाले नाही, केवळ निरपराध जीव गमावले जात आहेत, असे त्याने नमूद केले आहे.

# प्रसिद्ध उद्योजक रविंद्र माणगावे यांचा भाजपात प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. १९ :
सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील सावळवाडी या दोन हजार लोकसंख्येच्या छोट्याशा गावातून सुरू झालेली रवींद्र माणगावे यांची वाटचाल आज राज्याच्या राजकीय व उद्योजकीय विश्वात एक महत्त्वपूर्ण टप्पा पार करत भाजपात अधिकृत प्रवेशाने नव्या अध्यायात दाखल झाली आहे.



भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश सोहळा संपन्न झाला. उद्योगक्षेत्रातील मान्यवर संतोष मंडलेचा यांच्या उपस्थितीने हा क्षण अधिक अर्थपूर्ण ठरला. या सोहळ्यास केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, भाजपा प्रदेश महामंत्री राजेश पांडे, मनसे चित्रपट सेनेचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष रमेश परदेशी (पिट्याभाई), पुणे मनसे चित्रपट सेनेचे अध्यक्ष चेतन धोत्रे, तसेच आनंद कुंदूर, करण सुरवसे, कृणाल कड्डू, ॲड. अक्षय वाडकर, गजेंद्र परदेशी, ओंकार किराड, अनुराग गड्डम, अनुराग पाटील, प्रसाद भोसले आणि ऋतिक ननावरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली राज्यात उद्योगविकास, ग्रामविकास आणि तरुण उद्योजकता या तीनही क्षेत्रांना मिळालेल्या नवसंजीवनीमुळे रवींद्र माणगावे प्रखरपणे प्रेरित झाले. विशेष म्हणजे, गाव तिथे उद्योजक हा त्यांचा मुख्य ध्यास, गावागावात उद्योगनिर्मिती घडवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणे, याला राजकीय व्यासपीठावरून वेग मिळावा, ही भावना त्यांनी व्यक्त केली आहे. मुख्यमंत्र्यांच्या कार्यशैलीने प्रभावित होऊन त्यांच्या नेतृत्वाखाली हे स्वप्न अधिक भक्कम करण्याचा संकल्प त्यांनी सोहळ्यात व्यक्त केला.

शेतकरी कुटुंबाच्या मातीतून आलेले रवींद्र माणगावे बालपणापासून ग्रामीण प्रश्नांच्या आणि सामान्य माणसाच्या संघर्षांच्या मुळाशी गेले. लोकसेवेची प्रेरणा आईकडून मिळाल्याने वयाच्या केवळ २१ व्या वर्षी ते सरपंच म्हणून निवडून आले आणि नेतृत्वाचे पहिले पाऊल भक्कम रित्या रोवले. सामाजिक कार्य, लोकसंपर्क, आणि नागरिकांच्या कल्याणासाठी काम करण्याची त्यांची धडाडी सातत्याने वाढतच गेली.

आज महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष म्हणून, राज्यातील हजारो नवउद्योजक घडविण्याचे मोठे ध्येय ते पुढे नेत आहेत. पण आता, भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून हे ध्येय राज्यव्यापी गाव तिथे उद्योजक आंदोलन बनवून पुढे नेण्याचा दृढ निश्चय त्यांनी केला आहे. ग्रामीण युवकांनी उद्योगक्षेत्रात उतरावे, लघुउद्योग फुलावेत, शेतीपूरक उद्योग वाढावेत आणि प्रत्येक गाव उद्योजकतेचे केंद्र बनावे, ही त्यांची जीवनदृष्टी आहे.

रवींद्र माणगावे यांचा भाजपमध्ये प्रवेश म्हणजे पक्षाला एक समर्पित, उद्योजकता, विकासाभिमुख, लोकांशी जोडलेला आणि कामावर विश्वास ठेवणारा नेतृत्वगुणी कार्यकर्ता मिळणे होय. त्यांच्या समावेशामुळे ग्रामीण उद्योजकतेला गती, आणि महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला नवा आयाम लाभेल, अशी भावना पक्ष नेतृत्वाने व्यक्त केली आहे.